# बिन्दूत सिन्धू

लेखक-

## स्वामी सत्यभक्त

अनुवादकः- कृष्णराव भासल

प्रकाशकः- सौ. वीणादेवी सत्यभक्त

सत्याश्रम वर्धा ( सी० पी० )

UNIVERSITY LIBRARY
6 MAY 1941
ALLAHABAD

2601
22 H

प्रथमावृत्ति

किंमत बारा आणे

# सत्यभक्त साहित्य

यांत सर्व धर्मांचा सार आहे. ह्या युगांतील धार्मिक, सामाजिक राष्ट्रीय अंतर्राष्ट्रीय, सांकृतिक, कौटुंबिक, दाम्पत्य संबंधी सर्व तऱ्हे-च्या प्रश्नांचें व्यावहारिक समाधान आहे. गद्यपद्य, नाटक, कथा, इत्यादि विविध रूपांत डझनों कलापूर्ण ग्रंथ आहेत, ह्याच जगाला स्वर्ग बनविण्याकरितां, अंगी मनुष्यपणाचा भाव आणण्याकरितां सत्य-भक्त साहित्य वाचणें जरूरी आहे. ह्याच्या वाचनामुळें आपलें बहुतेक सर्व प्रश्न सुटतील. पूर्ण सेट अथवा मुख्य मुख्य ग्रंथ मागवून वाचावे. सूचीपत्र पहावें

---

# संगम

संगमच्या लहरांतील व्यंग असाधारण आणि फारच मर्मस्पर्शी असतात. लेख, कविता संवाद आणि सामयिक टिपण्या अत्यंत मौलिक व विचारपूर्ण असतात. धार्मिक, सामाजिक, राजनैतिक सर्वच विषयांवर आपणांस यांत फारच मौलिक तर्क संगत आणि स्पष्ट विचार मिळतील.

---

मुद्रकः—बापूराव लुतडे. मैनेजर,
सत्येश्वर प्रिं. प्रेस, वर्धा.

95260

# प्रस्तावना

श्री. स्वामी सत्यभक्तजींच्या ह्या लघुकथा साहित्य-संसारांत एक विचित्र वस्तु आहे. यांत विनोदपूर्ण रितीनें असे चिमटे घेतले आहेत कीं ते पाठकांच्या हृदयांवर कायमची छाप मारून जातात.

यांतील कांहीं लघुकथा संगम मासिकांतून बाहेर पडल्या असून त्यांच्या पाठकांच्या तोंडाला पाणी सोडणाऱ्या होत्या. कांहीं पाठकांचा आग्रह होता कीं अशा कथा मराठींतून लवकर प्रकाशांत याव्यात. त्यावेळीं येथें सत्याश्रमांत श्री. कृष्णराव भोसले मॅनेजरचें काम करित होते. त्यांचेकडून ह्या लघुकथांचा अनुवाद मराठींत करण्यांत आला. हिंदींत 'गागर में सागर' च्या नांवानें प्रकाशित झाल्या असून मराठींत 'बिंदुत सिंधू' ह्या नांवानें प्रकाशित करण्यांत येत आहे. मराठींत दोन कथा जास्त आहेत आणि त्यापैकीं एकी (दोन कुंभार) चा अनुवाद मी केला आहे.

श्री. स्वामी सत्यभक्तजींचे विशाल साहित्य मराठींत करण्या-बद्दलची मागणी पुष्कळ दिवसापासून चालली आहे. आनंदाची गोष्ट आहे कीं 'बिंदूत सिंधू' पासून तिचा आरंभ होत आहे. ह्या पुस्तकासंबंधीं विशेष बोलण्याची जरूर नाहीं पाठकगण पुस्तक वाचूनच समजू शकतील.

सौ. वीणादेवी सत्यभक्त

# विषय सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १ नो एडमिशन | १ | १८ आग विझल्या | ४१ |
| २ मोठा अस्पृश्य | ३ | १९ लज्जा योग्य | ४२ |
| ३ पूर्वपश्चिम | ४ | २० जुनें तें सोनें | ४४ |
| ४ आज्ञाधारक | ६ | २१ क्रिया महात्म्य | ४६ |
| ५ साधुंचा शोध | ७ | २२ शास्त्र वचन | ४८ |
| ६ उंदीर प्रताप | १० | २३ डाक्टर साहेब | ५१ |
| ७ नवें जुनें | ११ | २४ चिखलांतील कमळ | ५७ |
| ८ हारजीत | १३ | २५ कालमोह | ६० |
| ९ इज्जतदार | १५ | २६ जुलाब | ६९ |
| १० नमस्कार आणि बैल | १६ | २७ लाठी बनाम कानून | ७१ |
| ११ अद्भुत जनावर | १८ | २८ परीक्षेची योग्यता | ७४ |
| १२ खरा मुसलमान | २० | २९ मेजवानी | ७८ |
| १३ अनुभवाचा धडा | २१ | ३० बड्या बापांचे बेटे | ८२ |
| १४ बलवान कोण | २३ | ३१ तीन पागल | ८३ |
| १५ मेंबर साहेब | २४ | ३२ दोन कुम्भार | ८७ |
| १६ आतां कुठें बसावें | ३२ | ३३ पाहिजे | (क) ९१ |
| १७ वैद्यराजांचा प्रयोग | ४० | ३४ सत्यसमाज | ९१ |

# विदूत सिंधू

## 'नो एडमिशन'

हल्लीं काय हा माशांचा त्रास बुवा ! जेवण घरांत जावें तो माशाच माशा ! त्यांचें भिणभिणणें सारखें सुरूंच ! समोर कंपाऊंड-कडे नजर टाकावी तर जनावरें फाटकांत शिरून आंत येत आहेत ! भाजीपाल्याचा व फुलझाडांचा सारखा नाश चालविला आहे त्यांनीं ! मला तर कांहीं उपाय सुचेना—तुह्मीच सांगा कांहीं तोड !

'अहो इतकें लांब कशाला ! उपाय अगदीं सोपा आहे—माजघराच्या दरवाज्यावर व बागेच्या फाटकावर "परवानगी शिवाय आंत येऊं नये" अशी सूचनार्थक पाटी द्या लावून झालें ! पाहूं या [illegible] प्राणी कसे आंत येतात तें !

'पण तुमच्या सूचनेनें त्यांचा धिंगाणा बंद होणार कसा ?'

'कां नाहीं होणार ?'

'मोठमोठ्या ऑफिसांच्या दरवाज्यावर अशाच तऱ्हेच्या पाट्या लावलेल्या तुम्ही पाहिल्याच असतील, व यामुळें काम असल्या खेरीज दुसरे कोणीच तेथें जात नसतात हें पण तुम्हाला माहीतच असेल !'

ते ठीक आहे, पण जेथें माणूसकी असते तेथेंच असल्या गोष्टींचा उपयोग ! पण जेथें मुळांतच माणूसकी नसते असल्या प्राण्यांकरितां तुमच्या या सूचनांचा काय अर्थ ?'

'अर्थ ? अगदीं स्पष्ट आहे ! स्वार्थांध, आततायी व साम्राज्य-वादी लुटारू यांच्यावर अहिंसा व प्रेम यांचे प्रयोग करून पाहण्याचा जो अर्थ आहे तोच अर्थ असल्या सूचनांचा पण आहे !'

'पण जेथें दुसरा कोणताच उपाय शिल्लक नसतो तेथें असे प्रेम-प्रयोग करूं नयेत तर काय करावें' ?—तुम्हीच सांगा !

'तुमच्या या सिद्धांताला मी कोठें नाकबूल आहे ! मी तरी हेंच सांगतो कि, जेथें जनावरें व माशा बंद करण्याचा दुसरा कोण-ताच उपाय शिल्लक नाहीं तेथें 'परवानगी शिवाय आंत येऊं नये' चा बोर्ड टांगून द्यायला कोणती हरकत आहे ? मोठमोठें राजनैतिक पुढारी जेव्हां 'सम थींग इज बेटर देन नथींग' ( कांहींच नसण्या-पेक्षां कांहीं असणे बरें ) च्या नीतीनें चालतात तर त्याच नीतीनें आपणांस अशावेळीं चालण्यास हरकत कोणती' ?

# मोठा अस्पृश्य

१ ला—तुह्मी काय समजतां मला ? मी कधींच कुणाच्या हातचें अन्न-ग्रहण करीत नाहीं.

२ रा—पण मेवा मिठाई फराळ वगैरे तर तुह्मीं दुसऱ्याचें हातचा घेतांच की नाहीं ? अहो अन्नग्रहण तर सोडाच पण मी दुसऱ्याचे हातचा फराळसुद्धां करीत नाहीं. मी तुमच्यापेक्षां खास उच्च आहे.

३ रा—आणि मी तर तुमच्यापेक्षां उच्च आहे. कबूल आहे की तुह्मीं दुसऱ्याचें हातचा फराळसुद्धां करीत नाहीं. पण मी तर पाणीहि पीत नाहीं, मग फराळ तर दूर राहिला.

४ था—असाल ! तुह्मीं उच्च असाल, नाहीं, नाहीं म्हणत मी. पण माझे बरोबर मात्र नाहीं. तुम्हीं पाणी नसाल पीत, पण दुसऱ्याला शिवतांच की नाहीं ? मी तर अस्पृश्यांची सावलीसुद्धां घेत नाहीं.

५ वा—दादासाहेब, धर्माची तत्वें फार सूक्ष्म आहेत. आपण म्हणतां एवढ्यानेंच केवळ भागत नाहीं. अस्पृश्य ज्या रस्त्यानें जातात, त्या रस्त्यानें तुम्हांला जाण्याचा प्रसंग पडला तर तुम्हीं सचैल स्नान केले पाहिजे नाहींतर धर्मभ्रष्टता आलीच ! आमचे गावांत तर आह्मीं अस्पृश्यांकरितां येण्याजाण्याचे रस्तेसुद्धां ठरवून दिले आहेत. इतर रस्ते त्यांना बंद. आणि आम्हांला कधीं घराबाहेर पडावेंच लागले तर परत घरी आल्यावर स्नान करतो.

१ ला—काहीं तुम्हीं नाहीं बोलत काहीं ? तुमचा शुद्धा-शुद्ध व्यवहार कसा काय आहे ?

६ वा—मला तर सांगण्यासारखे कांहींच नाहीं. मला सर्वां-च्याच हातचे खान-पान चालते, आणि सर्व रस्त्यानें सर्वांच्याच घरीं मी जातो येतो. फक्त एकच विचार करतो कीं, मी पापाची कमाई तर खात नाहीं ना ? आरोग्य विघातक वस्तू तर खात नाहीं ना ? मी तर बुवा सत्यसमाजी आहे, जात पात न मानणारा आहे.

१ ला—मग तर तुम्हींच सर्वांत मोठें अस्पृश्य आहांत !

६ वा—छेः छेः माझेपेक्षांहि एक मोठा अस्पृश्य अजून आहे.

१ ला—तो कोण ?

६ वा—परमेश्वर ! तो सर्वांच्याच घरांत-हृदयांत राहतो ! कुणीहि, कशाचाहि नैवेद्य दाखवला तरी स्वीकार करतो. तो नाहीं कुणाला अस्पृश्य मानीत, नाहीं अगम्य मानीत !

---

## पूर्व-पश्चिम

आगगाडी भकभक करीत रस्ता कापीत चालली होती आणि प्रवासी आपसांत वार्तालाप करीत होते. त्या डब्यांत बहुतेक मुस-लमानच भरलेले होते, दूर एका बांकावर या गप्पांकडे दुर्लक्ष करून एक फकीर नाममाला जपीत बसला होता. त्याचे दृष्टिपुढें निसर्ग नाचत होता आणि पाठ या इतर प्रवाशांकडे होती.

एक मुसलमान प्रवासी—लोक म्हणतात कीं हिंदु-मुसलमा-नांचे हृदय मीलन होईल ! काय कपाळ होईल ? एक पूर्वेला तोंड करून पूजा करतो तर दुसरा पश्चिमेकडे नमाज पढतो, दोघांची

तोंडसुद्धां जिथें एकाला एक मिळत नाहींत तिथें हृदयें कशीं मिळणार ? मग कुठें हृदय मीलन आणि कुठें प्रेम ? इतर मुसलमान प्रवासी हां हां करून मान तुकवूं लागले, इतक्यांत त्या फकीरानें दोहा ह्मटला: —

क्या पूरब, क्या पश्चिम भाई, क्या मंदिर क्या मसजिद ।
खुदा जहां किब्ला है वोही खुदा भरा तिल-तिल में ।
है किब्ला तेरे दिल में ॥

दोहा कानीं पडतांच सर्व प्रवासी टवकारून तिकडे पाहूं लागले. परंतु फकीर तसाच बसून राहिला. तेव्हां वरील प्रवासीच पुनः ह्मणाला खूब ऐकवलेत आपण ! आपले निवासस्थान ?

पण तरीहि त्या फकीरानें तोंड न फिरवतांच उत्तर दिले मी तर एक गरीब फकीर आहे, माझे काय निवासस्थान असणार कधीं मशीदीत तर कधीं स्मशानांत !

पण भाई कृपा करून आमच्याकडे तर तोंड करून बसा त्या शिवाय गप्पागोष्टींला काय मजा येणार ?

फकीर—पण माझे आपल्यावर फार प्रेम असल्यामुळें मी आपलेकडे तोंड करून कसा बसूं ?

प्रवासी—काय ह्मणतां आपण? 'प्रेम तिथें लज्जा' ही तर स्त्रियांची गोष्ट झाली. त्याच एक प्रेमीजनांसमोर तोंड फिरवतात. पण आपण तर पुरुष आहांत !

फकीर—तसा तर मी आहेच. पण आमचा प्रश्न स्त्री पुरुषांचा नसून दिशांचा आहे, पूर्व पश्चिमेचा, उत्तर दक्षिणेचा आहे. आतांच पहाना, आपले तोंड आहे पूर्वेकडे, आणि गप्पागोष्टींत मजा

येवो वा न येवो माझे हि तोंड पूर्वेकडेच आहे. पण मी जर आपले कडे तोंड फिरवले तर ते होईल पश्चिमेकडे. तेव्हां परस्परांची जिथे एक दिशाच होणार नाहीं तिथें हृदय मीलन कसे होणार नी प्रेम कसे बसणार ?

प्रवासी साहेब फार शरमिन्दे झाले, आणि आपले जागेवरून उठून फकीरा समोर जाऊन बसले. फकीर हसूं लागला, प्रवाशांनी साष्टांग नमस्कार घातला आणि या वेळीं एकाचे तोंड होते पूर्वेकडे नी दुसऱ्याचें पश्चिमेकडे.

---

## आज्ञाधारक

आई मी तुझा आज्ञाधारक मुलगा व्हावे अशीं माझी इच्छा आहे, तेव्हां तूं जे कांहीं सांगशील ते करण्यांत मी बिलकुल कसूर करणार नाहीं.

तुझ्या बद्दल माझी हीच उमेद होती बाळ ! तुला लहानाचा मोठा करतांना फार मेहनत घेतली मी, किती तरी आशा बाळगल्या होत्या कि, तूं मोठा होशील, मेहनत करशील, आणि आपले दारिद्र दूर होईल.

आई, आज पासून—नव्हे आतांपासूनच—मी मेहनत करायला तयार आहे.

तर जा बाळ, बाजारांत जा कांहीं मेहनत कर. अंगाचा घाम काढशील तर चार पैसे मिळतील. घरची गरीबी दूर होईल.

(२)

संध्याकाळीं मुलगा थकून भागून बाजारांतून घरीं आला आणि एका कोपऱ्यांत जावून बसला. चेहरा त्याचा उतरून गेला होता. आईने विचारलें

काय बाळ, गेला होतास बाजारांत, काय आणलेस ?

मुलानें रडक्या चेहऱ्यानें उत्तर दिलें—आई फसवलेंस तूं मला ! तुझ्या ह्मणण्याप्रमाणें मी बाजारांत जावून एका चौरस्त्यावर खूब दंडबैठका काढल्यांत. शेवटीं घामाच्या धारा लागल्यात नी मी थकून गेलो. पण छदाम मिळाला नाहीं. लोक पाहून हंसत होते नी जात होते. मी तुझी आज्ञा अक्षरशः पाळली. पण उपयोग कांहींच झाला नाहीं आतां मी तुझे कधींच ऐकणार नाहीं.

आई ह्मणाली—खरं आहे बाळ, असा आज्ञाधारक असण्यापेक्षां नसणें बरें.

## साधूंचा शोध.

कांहो तुह्मी या जनावरांची कां पूजा करितां ?

साहेब मी साधूंचा भक्त आहे, एक मुनिवर्य मला भेटलें होते त्यांनीं सांगितले कीं—नग्नतेशिवाय साधुता नाहीं, इतकेंच नव्हे तर जिथें नग्नता असेल तिथें साधुंची सर्व लक्षणें येतात. ह्मणून नग्न दिगंबर सोडून तूं कुणाचीच पूजा करूं नकोस. तेव्हां पासून मी नग्न दिगंबराचीच पूजा करतो. आणि या दिगंबरतेच्या कसोटीला पशु तेवढा परिपूर्ण उतरतो.

काय मूर्खपणा हा—नग्न राहिल्यानें कां कुणी साधु होतो ? तुम्हांला साधुची खूण माहित नाहीं.

काय आहे साधुची खूण ?

जो तोंड बांधून घेतो तो साधू, तोंडावर कपडा बांधल्यानें हवेंतील जीवजंतुहि मरत नाहींत. समजलें ?

होय महाराज, समजलो.

(२)

अरे ! कांहो या घोड्याची काय म्हणून पूजा करतां ?

मी साधुपूजक आहे महाराज .एका साधुनें सांगितलें होते कीं–तोंड बंद ठेवणोर साधु असतात–या घोड्याला तोबरा लागला होता. मी विचार केला, याहून श्रेष्ठ कोण असणार आपले तोंड बंद करणारा ? म्हणून याची पूजा करूं लागलो.

पागल आहांत, तोबरा लावल्यानें कां कुणी साधु होतो. साधुची खूण तोबरा नाहीं जटा आहेत. समजले ?

हो महाराज समजलो.

(३)

अरे वा हे नारळ देव्हाऱ्यांत कां ठेवले ? आणि याच्यावर ही फुलें कशाला वाहिलीत ?

याची पूजा केली होती. मी साधुपूजक आहे एका साधु महाराजानें सांगितले होते कि साधुची खूण म्हणजे जटा. तेव्हां मी विचार केला कि, नारळाशिवाय अशा स्वाभाविक जटा कुठें मिळ-णार ! म्हणून याची पूजा करायला लागलो.

छे: छे: ही खुण नव्हे साधूला ओळखण्याची ?

मग कोणती खूण तर ?

'भगवे' धारण करणारा तो साधू. समजले'?

होय महाराज.

(४)

अरे अरे या कुत्र्यापुढें धूप, दीप ? आहे काय भानगड ही ?

मी साधुपूजक आहे महाराज मला एका साधु महाराजानें सांगितले किं भगवे धारण करणारा तो साधु. मी विचार केला किं, इतका नैसर्गिक भगवा रंग कुत्र्याशिवाय कुणाचाच नाहीं. म्हणून याची पूजा करूं लागलो.

काय मूर्खपणा हा ?

कसा मूर्खपणा ? मी तर प्रत्येकाच्या सांगण्याप्रमाणें करतो आहे परंतु अजूनहि मला साधूचें दर्शन कांहीं झालें नाहीं. आपण करवूं शकतां मला साधुदर्शन ?

तुह्मी काय करित असतां ?

मजूरी ! आठ तास मजूरी केल्यावर वांचणाऱ्या वेळांत सकाळीं देवाचें नामस्मरण, आणि मोहल्यांतील विधवा व मुलें जे काम सांगतात तें काम करतो. मी मूर्ख या शिवाय काय करूं शकणार ?

बरं या बद्दल तुह्मांला काय मिळकत होते ?

मिळकतीकरतां मी मजूरी करतो. त्यांची कामें पैशाकरतां नाहीं करित मी. मजूरीनें पोटापुरते मिळूनच जाते. मग कोण्या रोग्यांची सेवा, एकाद्या अनाथ बाईचें सामान आणणें, कुणाचें मूल सांभाळणें, कुणाची गाय दोहणें अशा कामांत जर मी उरलेला वेळ

खर्च केला, तर काय नुकसान आहे माझे ? त्यांचे काम झालें, आपला वेळ गेला. यांत पैसे देण्याघेण्याचा काय संबंध ?

मग होईल तुम्हांला साधुदर्शन !

होईल ? धन्य मी. सांगा, सांगा केव्हां होईल ? कुठें होईल !

आतां आणि इथेंच. पहा. ( आरसा दाखवतो )

काय पाहूं ? हा तर आरसा आहे. यांत तर माझेच तोंड दिसते.

बस तुम्हीच साधु आहांत, जो कमीतकमी घेऊन जास्तीत जास्त देतो—त्यालाच साधु म्हणतात. ठीक आहे साधु महाराज मी प्रणाम करतो आपल्याला. साधुदर्शना करितां आतां कोठेंहि तुम्हांला भटकण्याची जरूरी नाहीं.

## उंदीर प्रताप

आमच्या एका शेजाऱ्यानें देव्हाऱ्यातील मूर्ति मोड म्हणून कासाराला विकून टाकल्या.

असें कां झालें ?

एके दिवशीं उंदरांनीं लंगडा बाळकृष्ण लवंडून दिला, आणि ती मूर्ति रात्रभर जशीच्या तशीच पडली राहिली, उठून बसूं सुद्धां शकली नाहीं.

सकाळीं मूर्तिची जेव्हां ही दुर्दशा दिसली. तेव्हां त्यांनीं विचार केला कि, बाळकृष्णासारखा देव जिथें उंदरापासूनसुद्धां आपलें रक्षण करूं शकत नाहीं तिथें या विशाल संसारांत एकापेक्षां एक बलवद असणाऱ्या दैत्यदानवांपासून आमचे रक्षण कसें काय करणार ?

मोठा ताप आहे या उंदराचा ! यांच्या त्रासामुळें आमच्या दुसऱ्या एका शेजाऱ्यानें आपली ५।७ हजार रुपयांची लायब्ररी एका रद्दीवाल्याला ५।७ रुपयांत फुंकून टाकली.

असें कां झालें ?

एकें दिवशीं हे उंदीर लायब्ररीच्या कपाटांत शिरून पुस्तकें कुरतडूं लागलेत. त्यांनीं पाहिले तर अंधारांत उंदीर कांहीं दिसले नाहींत. नंतर आणला त्यांनीं कंदील, उंदीर गेले पळून, तेव्हां त्यांनी म्हटले कि जी पुस्तकें अंधारांत उंदरांनाहि दाखवूं शकत नाहींत, ती संसाराच्या या घनदाट अरण्यांत कल्याणाचा मार्ग काय दाखवणार ?

बापरे, फार प्रताप आहे या उंदरांचा !

ह्मणूनच तर गणपतीनीं याला वाहन केलें आहे.

ह्मणजे काय ?

ह्मणजे जो गणेश आहे—गणांचा ईश आहे—अर्थात पुढारी आहे, त्यांनीं उंदरांची पर्वा न करतां त्यांच्यावर स्वार होवून त्यांना आपल्या ध्येयमार्गावर धांवायला लावलें पाहिजे.

## नवें-जुनें.

एक सज्जन—आमचा धर्म पांच हजार वर्षांचा जुना आहे.

दुसरे स०—आमचा धर्म तर पांच लाख वर्षांचा आहे जुना आहे.

तिसरे स०—आमचा तर पांच कोटी वर्षांचा आहे.

चौथे स०—कांहो, आपण कुणाचा धर्म सर्वांत जुना समजतां?

मी०—जो सर्वांत वाईट असेल तो धर्म सर्वांत जुना समजावा

तीसरे स०—असें कां बरें ?

मी—त्याचें कारण असें कीं, पाप सर्वांत जुनें आहे, आणि सर्वांत वाईटहि आहे.

चौथे स०—बरोबर सांगितलेंत आपण, ह्मणूनच तर मी नव्याचा भक्त आहे. जुन्याचा मी नेहमी तिटकारा करतों.

मी—आपल्या बापाची काय इच्छा आहे ?

चौथा स०—त्यांचीहि हीच इच्छा आहे.

मी—आणि आपल्या परमपूज्य पुत्रांची ?

चौथे स०—ही कशी काय आपली बोलण्याची पद्धत? माझ्या परमपूज्य वडिलांना फक्त बाप म्हणतां, आणि मुलाला परमपूज्य पुत्र म्हणतां—

मी—ह्मणजे ? मुलापेक्षां आपण वडिलांना पूज्य समजतां ?

चौथे स०—अर्थात् !

मी—पण माफ करा हं, माझी कल्पना होती कीं, आपण मुलाला पूज्य समजतां, आणि वडिलाला अपूज्य समजतां, कारण आपण नव्याचें पुजारी म्हणवतां ! आणि वडिलापेक्षां मुलगा नवा आहे, तेव्हां तोच आपल्याला पूज्य असेल ! यांत आपल्याला नाराज वाटण्याचें कांहींच कारण नाहीं.

# हार-जीत

( रस्त्यानें श्रीरामचंद्राची पालखी निघालेली आहे. )

हिंदु ने०—बंधूंनों आतां मसजीद येईल मुसलमान बंधूंचा हा नमाजाची वेळ आहे या करितां तेथें पोहचतांच वाद्य थांबवून आपणहि थोडें ध्यान करूं या !

१ हिंदू—काय ? आपणहि नमाज पढायचा ?

हिंदू ने०—अर्थात्‌ कारण नमाज हीहि एक ईश्वराची आराधनाच आहे.

( २ )

( मशीदींत मुसलमान उभे आहेत. )

मौलवी—थांबा बंधुनों, हजरत रामचंद्रजींची पालखी येत आहेसे वाटते. आपण थोडा वेळ थांबू या, पालखी निघून गेल्यावर नमाजाला सुरवात करूं.

१ मुसलमान—पण नमाजाची वेळ टळेलना ?

मौलवी—सर्ववेळा अल्लाच्याच आहेत, तेथें चुकण्याचा प्रश्नच नाहीं. आणि नमाजाचें ऐवजी भजन झालें तर कुठें बिघडलें. अल्लामियाला नमाजहि समजतो तसें भजनहि समजते. तेव्हां या वेळीं नमाजाचें जागीं भजन झाल्यास कांहीं बिघडत नाहीं.

( मिरवणूक मशीदी जवळ येते मुसलमान सामोरे येतात. वाद्य बंद होवून शांतता होते व सर्व उभे राहतात. )

मौलवी—बंधुनों आपण थांबलांत कां ? चालू द्या भजन, आम्हीहि टाळ घेतों.

हिंदू ने०–हा नमाजाचा वेळ आहे. यावेळीं आम्ही सर्व शांत होवून नमाजांत वांटेकरी व्हावे म्हणतो.

मौलवी–पण सुरूं असलेलें भजन—अल्लाचें गुणगान—बंद ठेवून नमाज पढण्यांत काय विशेष आहे ? भजनच चालूं द्या ! आज नमाज थोड्या वेळानें चालूं करूं.

हिंदू ने०–छे: छे: भजनाची वेळकाळ कधींच ठरलेली नाहीं. पण नमाजाची वेळ ठरवलेली आहे.

मौलवी–सर्व वेळा अल्लानीच घडवल्या आहेत, तेव्हां चुकण्याचा प्रश्नच नाहीं, सर्व बंधू एकत्र येण्याला कांहीं ठरावीक वेळेचें बंधन पाहिजे म्हणून पैगम्बरांनीं नमाजाच्या वेळा ठरविलेल्या आहेत. आम्ही सर्व एकत्र आलोच आहोत तेव्हां नमाज मागेंपुढें हि पढतां येईल ! शिवाय भजन आणि नमाज या दोन्हीं अल्लाच्याच पूजा आहेत. यावेळीं अल्ला भजन ऐकत असेल ते थांबवून जर नमाज सुरूं केला तर तोही म्हणेल कीं गोडामध्यें ही तिखट खारट चव कुठली ?

हिंदू ने०–पण यामुळें फायदाच होईल. मेजवानीची मजा चटणी कोशिंबिरी शिवाय येतच नाहीं. तेव्हां भजनांत नमाज आल्यामुळें भजनाचीच किंमत वाटेल.

मौलवी–ठीक आहे बाबा, आम्ही हरलो तुम्ही जिंकलें. ( सर्व मिळून प्रथम नमाज पढतात नंतर भजन करतात व मग मिरवणूक पुढें जाते )

---

# इज्जतदार

आगगाडी चालू होती, गप्पागोष्टी चालू असतांना एक गृहस्थ दुसऱ्यास ह्मणाले इकडील स्त्रियांना लाज शरम मुळींच नसते. मी पाहिले आहे कीं त्या मोटसा पदरसुद्धां घेत नाहींत.

२ रे गृहस्थ ह्मणाले—लाजशरम तर असते! पण नाकाचें शेंड्यापर्यंत पदर कशाकरितां ध्यावया? पति ह्मणजे तर आपला परमेश्वर-जीवन-समजते ती. तेव्हां त्याचें करितां तर पदर घेण्याची जरूरच नाहीं, आणि पुरुषापैकी कोणी पित्या समान तर कोणी भ्रातासमान, किंवा पुत्रासमान असतात. बाप, भाऊ आणि मुलगा यांचें समोर पदर घेण्याची काय जरूरी?

अहो पण आमच्या घरंदाज अंगना तर अंगणा बाहेर हि कधीं पडत नाहींत. आणि पुरुषांची गोष्ट तर दूर राहिली, स्त्रियांशीहि त्या बोलूं शकत नाहीत. अशा आहेत आमचे येथील स्त्रिया मर्यादशील!

अरेरे मग आपलेकडील पुरुषांची फार वाईट परिस्थिति असेल! स्त्रियांसमोर त्यांची तीळमात्रहि इज्जत नसेल?

कां बरें? पुरुषांची इज्जत तर स्त्रियांपेक्षां कितीतरी पटीनें जास्त आहे.

असें कां? मग तर आणखीच पंचाइत, घराबाहेरहि न पडणाऱ्या कुळवान् स्त्रियांपेक्षांहि ज्यांची जास्त इज्जत आहे असे पुरुष, नेहमीं पेटींतच बंद राहात असतील, आणि स्त्रियांशीहि गप्पागोष्टी न करणाऱ्या इज्जतदार स्त्रियांशी बोलतांना तर ते मुकेच होत

असतील, अरेरे मग आपल्यासारखे इज्जतदार पुरुष घराबाहेर पडून आगगाडीचा असा उघडा प्रवास करतात या त्यांच्या बेइज्जतीबद्दल मला फारच वाईट वाटते ! हॅं: हॅं: हॅं:

## नमस्कार आणि बैल

मी कुणापुढेंच मस्तक नमवित नाहीं. माझ्यापेक्षां कोणीच जगांत दुसरा श्रेष्ठ नाहीं.'

'राजापुढेंहि मस्तक नमवीत नाहीं ?'

'राजाला मी कांहींच समजत नाहीं.'

'माता पिता गुरुजन इत्यादि समोर तरी'

'ते तर माझे प्रमाणेंच आहेत. त्यांचे घरीं माझा जन्म झाला ह्मणून काय झाले ?

'काय गुरुजनांनासुद्धां अभिवादन करीत नाहीं ?'

'गुरुजनांची मला कधीं गरजच भासली नाहीं.'

'पण देवावतार, पैगम्बर, तीर्थंकर, संन्याशी इत्यादि महात्म्यांना तर अभिवादन करीत असाल ?'

'नाहीं कधींच नाहीं.'

'कधी मंदिर, मसजीद, चर्च येथें गेल्यावर तर अभिवादन करीत असाल ?'

'कधींच मी तेथें जात येत नाहीं. मी या गोष्टीला कांहीं महत्वच देत नाहीं.'

'तुमच्याहून श्रेष्ठ ज्ञानी, श्रेष्ठ लोकसेवक अशांनीं जर तुह्माला नमस्कार केला तरी तुह्मीं मस्तक नमवीत नाहीं ?

'छेः मी अशांची मुळींच पर्वा करीत नाहीं.'

'बरें कोणी लाठी घेवून तुह्मांला मारायला आला तर ?'

'लाठीचें भयानें मी त्याचें काम ताबडतोब करीन पण मस्तक नाहीं नमवणार.'

'निदान ईश्वरापुढें तरी मस्तक नमवितां कीं नाहीं ?'

'ईश्वराला सुद्धां मी कांहीं समजत नाहीं.'

'आतां लक्षांत आलें कीं तुह्मी एक महान व्यक्ति आहांत. तुमच्या सारखीच एक महान व्यक्ति माझेहि घरीं आहे.'

'ठीक ठीक, कोण बरें ? त्यांची माझी मैत्री झाली पाहिजे !'

'तो तुमचीहि पर्वा करणार नाहीं. तो माझे घरीं राहतो, खातो, पितो, काम करतो पण कधींहि कुणापुढेंहि मस्तक नमवीत नाहीं. हां जर मी कांहीं ओझेंच त्याचें डोक्यांवर ठेवलें तर त्याची मान झुकेल ही गोष्ट निराळी.'

'मग झुकणारच पण यामुळें कांहीं त्यांच्या मोठेपणाला धक्का लागत नाहीं. सांगा सांगा तर अशा महात्म्याचें नांव.'

'काय सांगू' ? सर्व लोक त्याला गोऱ्हा ह्मणतात. एक वर्ष झालें मी तो बैल विकत घेतला.

# अद्भुत जनावर

मंगळावर एक नवीन पशु संग्रहालय उघडण्यांत आले होते. पृथ्वीवरील निरनिराळ्या तऱ्हेची जनावरें तिथें एकत्र केली होती. मंगळनिवासी श्रेष्ठ नागरिकांची—ज्यांना सुमन म्हणतात ते—संग्रहालय पहायला भीड लोटली होती. एके दिवशीं एक श्रीमान सुमन तें संग्रहालय पहायला आला. रक्षकानें माहिती द्यायला सुरवात केली. अर्धे अधिक संग्रहालय पाहून झाल्यावर नागरिक रक्षकाला म्हणाला 'पृथ्वीवर पुष्कळ अद्भुत जनावरें आहेत. यांत कांहींच शंका नाहीं. इतक्या प्रकारचीं जनावरें आपल्या मंगळग्रहावर खास नाहींत. पण असें वाटतें किं, पृथ्वीवरील जनावराचा बौद्धिक विकास फार कमी झाला आहे.'

रक्षक—होय ! आपल्या ग्रहापेक्षां पृथ्वीग्रह मोठा असल्यामुळें फार उशीरा थंड झाला, म्हणून प्राणिमात्रांची उत्पत्ति आणि विकास तेथें फार मागासला आहे.

नागरिक—तें जावूं द्या. मी आणखी एकादेवेळीं हे संग्रहालय पहायला येईन. मला फक्त हे सांगा किं, या संग्रहालयांत सर्वांत शहाणें जनावर कोणतें ? व सर्वांत मूर्ख जनावर कोणते ?

रक्षक—मग चला तर त्या पिंजऱ्यापाशीं. नीट पहा पृथ्वीवरील हे सर्वांत बुद्धिमान जनावर आहे. रेलवे, मोटार, जहाज, पानबुडी, फोटोग्राफी, विमान, रेडियो वगैरे शेंकडों गोष्टींचा यांनीं शोध लावला आहे. याला मनुष्य असें म्हणतात.

नागरिक—अरे मग कांहीं दिवसांनीं तर हा आपले बरोबरीचा होईल.

रक्षक–हां ! होऊं शकेल. पण—

नागरिक–पण काय ?

रक्षक–पण—ते राहूं द्या, प्रथम तुम्हांला पृथ्वीवरील सर्वांत मूर्ख जनावर दाखवतो.

नागरिक–ठीक आहे. या जनावरांविषयीं मग बोलूं.

( त्याच पिंजऱ्याच्या दुसऱ्या बाजूला जातात. )

रक्षक–हे पहा ते सर्वांत मूर्ख जनावर.

नागरिक–काय हे ? हा तर तोच पिंजरा व तेच जनावर आहे, ज्याला मनुष्य ह्मणून पृथ्वीवर ह्मणतात असें तुह्मीं सांगितलें. हे तर सर्वांत बुद्धिमान जनावर आहे. आणि मला तर सर्वांत मूर्ख जनावर पहावयाचें आहे.

रक्षक–होय हेंच तें सर्वांत मूर्ख जनावर. एकीकडे हे सर्वांत बुद्धिमान जनावर आहे, तर दुसरीकडे सर्वांत मूर्ख जनावर हेंच आहे. या जातीचीं जनावरें आपसांत खूब भांडतात आणि लढतात. मूर्ख इतके आहेत कि, हजारों वेळां लढाई झगडे करून सुद्धां अजून यांना अक्कल आलेली नाहीं. एका देशाचें लोक निरर्थकच दुसऱ्या देशवासियांची कापाकापी करायला लागतात. भूक तर पावभर अन्नाची, पण संग्रह इतका करतील कि, दुसरी लाखों माणसें भुकेनें मरतील. एक दुसऱ्याला गुलाम तर करतातच. दुबळेपणांत लांगूलचालन आणि जरा ताकत आली कि दुसऱ्याला खाऊन टाकण्याची तयारी, हे आहेत यांचे गुण धर्म. या प्रमाणें लाखोंना हे खातील, आणि लाखों लोकांकडून हे खाल्ले जातील, खातात तेहि इतकें कि, अखेर पोट फाडून तें बाहेर पडते, यांनीं जितके कांहीं शास्त्रीय शोध लावलेत तितके

सर्व या जातीच्या प्राण्यांचा सत्यानाश करण्याच्या उपयोगी येवून राहिले आहेत. आपल्या बुद्धिवैभवानें यांनीं स्वर्गाची विलास सामग्री मिळविली पण मूर्खपणानें त्या सामग्री पासून नर्काची जोड निर्माण केली.

नागरिक–मग तर खरोखरच हें अद्भुत जनावर आहे. याच्या वर जरा मग जास्त लक्ष ठेवीत जा ! नाहींतर चुकून पिंजऱ्यांतून केव्हां बाहेर येईल नी आपल्या मंगळावर आपले मूर्खपणाचें जंतु पसरवून केव्हां अमंगळ करील याचा नेम नाहीं. बरें आहे येतो आतां, आतां कांहीं पाहण्याची गरज राहिली नाहीं. मनुष्य प्राण्याला पाहिल्यावर दुसरा मूर्खप्राणी मिळणें अशक्यच !

## खरा मुसलमान

बरें आहे मौलवी साहेब, येतो मी आतां, आपली नमाजाची वेळ होत आली आहे.

छे: छे: अगदीं आनंदानें बसा, मला कांहीं नमाज पढायचा नाहीं आज.

असें कसें होईल ? आपला तर नमाज कधींच चुकत नाहीं.

तो तर आजांहे कांहीं चुकला नाहीं. आतां आपण येण्याचें पूर्वींच, मी राममंदिरांतून जावून आलो आहे. तिथें दोन तीन तास खूप भजन झाले.

तर काय, तेवढ्यानेंच नमाजाचें काम भागलें ?

कां भागणार नाहीं ? राममंदिरांत कांहीं दुसरा खुदा थोडाच आलेला आहे.

तरी पण वेळेवर नमाज तर पढलाच पाहिजे.

अहो असें पहा, संध्याकाळीं मित्राचें घरीं तुम्ही जर पोटभर मेजवानी झोडलीत तर पुन्हा घरीं येवून जेवण करालच कां ?

कसें शक्य आहे ! कोणत्याही निमित्तानें कां होईना, एकदां पोटभर जेवण झाल्यावर पुन्हां कोण जेवण करणार ?

झालें तर मग, तीच गोष्ट प्रार्थनेची आहे. एकदां जर मी मनसोक्त देवाची प्रार्थना केली आहे, तर पुन्हां काय जरूर ? राम-मंदिरांत जर मी भजन केलें तर आतां पुन्हां नमाजाची काय जरूर ?

मौलवी साहेब, आपण खरें मुसलमान आहांत.

खरा मुसलमान व्हायला तर मला अजून वेळ आहे. पण इतकें मात्र खरें कीं, खरा मुसलमान होण्याच्या मार्गावर मी जरूर आहे.

मग त्याच पद्धतीनें मी खरा हिंदू बनूं शकेन ना ?

जरूर !

---

## अनुभवाचा धडा

मुलगा—बाबा, तिथें तो दगड होताना ? त्याची मला ठेंच लागली नी पडलो मी.

बाप—बाळ ! दगड, खडे, कांटे ही रस्त्यांत रहायचीच, तेव्हां जरा रस्ता पाहून चलावें.

( कांहीं दिवसानंतर )

मुलगा—बाबा आज मला पुनः ठेंच लागली.

बाप—मी सांगितलें होते बाळ तुला कि, रस्ता पाहून चालत जा म्हणून !

मुलगा—पाहूनच तर चालतो मी, त्या दिवशीं जिथें ठेंच लागली होती, तिथली तर पूर्ण आठवण ठेवली मी. आतां तिथें नाहीं ठेंच लागत, पण आज दुसरीकडे लागली.

बाप—बाळ एका जागेचा पाठ जर दुसऱ्या जागीं तूं उपयोगांत आणणार नाहींस तर तूं एकसुद्धां चूक आयुष्यभर सुधारूं शकणार नाहींस ! कारण संसारांत जागा इतक्या अनंत आहेत कि, तुझ्या आयुष्यांतील दिवसच काय पण तास, मिनिटें सुद्धां पुरणार नाहींत. एक चूक एका जागीं घडल्यावर सर्व ठिकाणीं जर तूं ती दुरस्त करशील तरच तुला मनुष्याची बुद्धि आहे असें ह्मणतां येईल.

एका ठिकाणचा अनुभव पशूंना फक्त त्याच ठिकाणीं उपयोगाला येतो. पण मनुष्याला तर तो सर्व ठिकाणीं उपयोगी पडायला पाहिजे.

मनुष्य हा अनुभव आणि तर्क यांचा समन्वय आहे. पशुमध्यें तर्क विशेषतः नसतो.

तर्क, अनुभवांचा गुणाकार आहे. आणि हा गुणाकारच मानव बुद्धिचा विशेष आहे. या गुणाकाराशिवाय अनुभवाचा धडा मिळत नाहीं.

---

# बलवान कोण ?

पादरी साहेब, कोण बलवान ? सत्येश्वर कि सैतान ?

काय अर्थ आहे हें विचारण्यांत ?—सत्येश्वर बलवान आहे हें सर्वांनाच माहित आहे.

किती पट बलवान आहे ?

चौपट, आठपट, दसपट, आणखी काय ?

जर सत्येश्वर बलवान आहे तर सैतान ईश्वरानें निर्माण केलेली प्रत्येक चीज कसा बिघडवून टाकतो ?

पादरी साहेब क्षणभर थांबून ह्मणाले —तुह्मी तर मूर्तिकार आहांत, उत्तम मूर्ति तयार करायला तुम्हांला किती दिवस लागतील ?

महिनोंगणती लागतात, चांगल्या मूर्तिला तर वर्षहि लागून जातें.

अरें तुह्मी तिची मोडतोड करायचा विचार केला तर किती वर्ष लागतील ?

त्याला वर्ष कशाला ? पांच मिनिटांचे काम.

मग माझ्या मुला, बिघडवण्यावरून कुणाच्या बलाचा अंदाज लागत नाहीं, तर बनवण्यावरून लागतो. एक महात्मा एका मनुष्याला दहा वर्षांत जितका तयार करील त्याच्या किती तरी कमी वेळांत एक दुरात्मा त्या माणसाला किती तरी पट बिघडवून टाकील. या वरून तूं सत्येश्वर आणि सैतान यांच्या बलांचा अंदाज लावूं शकशील.

# मेंबर साहेब

## (१)

वैद्यराज इथून जवळच एक खेडें आहे. तिथें बिमारीची खूप साथ आहे, तिथें चालून त्यांचे औषध पाणी करूं शकाल कां ?

औषधपाणी कां बरें करणार नाहीं, तेवढ्याकरितां तर मी बसलोच आहे ! सेवा हाच तर माझा धर्म आहे !

पण कांहीं अटी पाळाव्या लागतील.

सांगा अटी कोणत्या त्या, पाळण्याचा प्रयत्न करीन.

औषधपाणी फुकट द्यावें लागेल.

आणखी ?

रोग्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करावी लागेल

आणखी ?

आसपासचे जे रोगी येतील, त्यांच्या येण्याजाण्याची व्यवस्था करावी लागेल.

आणखी ?

तुह्मीच सर्वांत उत्तम वैद्य आहांत हे इतर वैद्यांशी वादविवाद करून सिद्ध करावें लागेल. त्या सर्वांची निंदा करावी लागेल, मग त्यामुळें तुमच्या मैत्रींत बिघाड होवून जन्माकरितां तुमच्यांत वैर निर्माण झालें तरी हरकत नाहीं.

आणखी ?

तुमच्याकडे निदान पन्नास रोगी येतीलच याची हमी दिली पाहिजे आणि त्या करितां पन्नास रुपये डिपॉजिट केले पाहिजेत.

पन्नास रोगी जर आपलेकडे आले नाहींत तर आपले डिपॉजिट जप्त होईल.

आणखी ?

मी आपल्या करतां इतकी मेहनत करणार त्या माझाहि मेह-नताना दिला पाहिजे.

असा एकंदर किती खर्च येईल ?

हजारांत भागून जाईल, मग आपली जशी लायकी असेल तसें ! जितका जास्त गुळ घालाल तितकी गोडी येणारच आहे.

पण मला मिळेल काय ?

हें हें हें.........आपण जनसेवक गणले जाल.

चल नीघ इथून बदमाश ! केवळ जनसेवक ह्मणवण्याकरितां मी कुणाचा गुलाम बनू ? अशी बेइज्जत करून घेऊं ?

(२)

वकील साहेब कांहीं गरीब माणसें अन्यायानें पोलीसच्या तावडींत सांपडली आहेत–आपण त्यांची केस कृपा करून घेऊं शकाल काय ?

कां बरें केस घेणार नाहीं ? अशीं सेवा करण्याकरतांच तर आमचें जीवन आहे !

योग्य बोललांत आपण ! पण कांहीं अटी आहेत त्या मानाव्या लागतील !

सांगा कोणत्या अटी ? त्या पाळण्याचा जरूर प्रयत्न करीन.

केस करतां जे जे लोक येतील, त्यांच्या खाण्यापिण्याची

व्यवस्था करावी लागेल.

आणखी ?

त्यांना येण्याजाण्याची कांहीं तकलीफ होऊं नये म्हणून टांगे, मोटार इत्यादिची व्यवस्था करावी लागेल !

आणखी ?

आणखी जे कोणी वकील येतील, त्यांच्याशी भांडून तुम्हांला हें सिद्ध करून द्यावें लागेल कि तुम्हीच सर्वांत उत्तम वकील आहांत ! मग त्यामुळें तुमची मैत्री दुरावली जावून वैर वाढले तरी पत्करेल !

आणखी ?

कमीत कमी आपल्याला पंचवीस तरी अशील वकीलपत्र द्यायला तयार आहेत हें सिद्ध करून द्यावें लागेल. आणि या गोष्टींची हमी म्हणून आपल्याला पन्नास रुपये जमा करावे लागतील. पंचवीस अशीलानी जर तुम्हांला वकील केलें नाहीं तर तुमचें डिपॉझिट जप्त.

बरें आणखी ?

मी आपल्याकरतां इतकी मेहनत करणार तेव्हां माझा आपल्याला योग्य वाटेल तो मेहनताना मला द्यावा लागेल.

पण असा कुल खर्च किती येईल ?

येईल हजार दोन हजार आणखी काय ? जास्त कराल तर तुम्हालाच जास्त फायदा मिळेल.

पण मला या गोष्टींबद्दल काय मिळणार ?

वा वा आपण जनसेवक म्हणून गणलें जाल.

ओ यू, स्टुपिड नॉन्सेन्स गेट आऊट !

( ३ )

मुन्नीजान एका यात्रेमध्यें हजारों माणसें येणार आहेत. तिथें चढून मुजरा देशील ?

वा वा कां बरें देणार नाहीं ?

पण तुला कांहीं अटी पाळाव्या लागतील ?

वा वा हें काय बरें बोलणें ! आज्ञा व्हावी कोणत्या शर्ती आहेत त्या !

मैफलींत जमणाऱ्या मंडळींकरतां लागणारी पानसुपारी, अत्तर गुलाब वगैरेचा खर्च तुला करावा लागेल !

पानसुपारीची वगैरे व्यवस्था मी करीन ! बरें आणखी ?

जाहीराती वाटून सर्व लोकांना बैठकिचें आमंत्रण द्यावें लागेल, बैठकिचा चहूंकडे प्रचार करावा लागेल !

बरें आणखी ?

मैफलींत येणाराकरितां वाहनाची व्यवस्था करावी लागेल !

वाहनाची व्यवस्था ? बरें ! पुढें ?

जितक्या कलावंतिणी तिथें येतील, त्या सर्वांत तूंच चांगली आहेस हे त्यांच्याशी भांडून सिद्ध करावें लागेल !

वा ! वा !! आणखी ?

आपले मैफलींत कमीत कमी पांचशे माणसें तरी येतीलच अशीं गॅरंटी दिली पाहिजे. त्या करतां पन्नास रुपये डिपॉझिट जमा करावे लागतील. आणि पांचशेपेक्षां कमी माणसें आलीत तर तुझे डिपॉझिट जप्त होईल.

वल्लाह ! बरें आणखी कांहीं ?

आणखी काय मी जी इतकी मेहनत करणार त्या मलाहि कांहीं मेहनताना द्यावाच लागेल.

असा एकंदर किती खर्च येईल ?

अंदाजे हजार दोन हजार ! मग आणखी जितका गुळ घालाल तितकी गोडी येणारच आहे !

पण मला काय मिळेल ?

हें: हें:………आपण जनसेविका ह्मणवाल !

चल निघ इथून × × × मलाहि बनवूं पहातो आहे, हरामजादा !

( ४ )

महाराज आपण यात्रेमध्यें उपदेश देवूं शकाल ?

कां बरें नाहीं देणार जे कांहीं दोन अक्षराचें ज्ञान परमेश्वर कृपेने प्राप्त झाले आहे, ते अखेर जगाला देण्याकरतांच प्राप्त झालें आहे.

मोठ्या आनंदाची गोष्ट आहे, पण आपल्याला कांहीं शर्ती पाळाव्या लागतील !

कोणत्या शर्ती ?

पहिली शर्त ही किं, गांवोगांव दौरा काढून आपले प्रवचनाला येण्याकरितां लोकांना समजून सांगावे लागेल.

हें ? हे कसें काय ?

असेंच आहे हे, इतकेंच नव्हे तर लोकांच्या येण्या. जाण्याकरतां वाहनांचीहि आपल्याला सोय करावी लागेल !

अस्सं !

हूं ! शिवाय जे कोणी उपदेशक आणखी तिथें येतील, त्यांच्याशी झगडून तुम्हांला हे सिद्ध करावें लागेल किं, तुह्मीच सर्वांत श्रेष्ठ उपदेशक आहांत ?

काय ? मला माझी आत्मस्तुति करावी लागेल ? माझे सह्याध्यायी आणि गुरुजन यांचा अपमान करावा लागेल ?

होय महाराज, ही जनसेवा आहे, यांत सर्व कांहीं करावें लागते !

मी नाहीं अशा तऱ्हेने श्रोतृवर्ग मिळवूं शकणार,

नाहीं शकणार तर आपले डिपॉझिट जप्त होईल. कारण उपदेशक म्हणून आपले नांव दर्ज करावयाच्या वेळींच, कमींत कमी पांचशें श्रोते तुमच्या प्रवचनाला हजर राहतील अशी तुह्मांला हमी द्यावी लागेल, नाहीं जमले तितके श्रोते तर पन्नास रुपये डिपॉझिटचें जप्त !

बरें ! या जुगारांत आणखी काय डावावर मांडावें लागते ?

आणखी कांहीं नाहीं फक्त मी जी कांहीं मेहनत करीन त्याबद्दल आपण जे उचित समजाल ते मला देण्यांत यावें !

किती होईल खर्च ?

हजार दोन हजार आणखी काय ! जास्त कराल तर जास्त फायद्यांत रहाल.

आणि याचें फळ काय मिळेल ?

हें: हें:………आपण जनसेवक ह्मणवाल !

बस, पुरे करा फार ऐकून घेतले मी तुमचें, जा आपण इथून आतां, आणि फिरून आपले हें काळेतोंड मला दाखवूं नका.

आणि हे पहा पुनः कुणा भल्या माणसाचा असा अपमान करूं नका

पण....पण....महाराज

चालते व्हा इथून एकदम माझा वेळ वाया घालवूं नका.

(५)

साहेब, असेंब्ली म्युनिसिपालिटी वगैरे मध्ये मेंबर होवून जनतेची सेवा करण्याची इच्छा आहे का आपली ?

इतकें आहे का माझें भाग्य ?

वा नाहीं ! माझ्या कांहीं गोष्टीं जर आपण मानाल तर सहज शक्य आहे हे.

असें असेल तर मी सर्व कांहीं मानायला तयार आहे.

पहिली गोष्ट तर ही कि थोडीशी रक्कम आपल्याला सरकारांत डिपॉझिट करावी लागेल. थोडेसेच मतदार जर आपल्याला साथ देतील तर आपले हें डिपॉझिट जप्त होईल.

कांहीं हरकत नाहीं, जनसेवेकरितां पैशाची पर्वा करणारा मी नाहीं, बरें आणखी कांहीं ?

दुसरें, मतदारांना पोलिंग स्टेशनवर आणण्याकरितां मोटारीची व्यवस्था करावी लागेल.

यांत काय विशेष ! मी तर एकेका मतदाराकरितां एकेक मोटार ठेवीन, हजार दोन हजार, चार हजार असें कितो पेट्रोल जळणार आहे ? मी काय एवढ्याची पर्वा करतो ?

ठीक ठीक ! तिसरी गोष्ट ही कि आपला प्रोपॅगंडा करण्याकरितां जागजागी आपल्याला प्रचारक पाठवावे लागतील.

हें तर करावेंच लागणार, त्या सर्वांचा खर्च मी देईन इतकेंच

नव्हे तर त्यांच्या घरीहि कांहीं कमी पडूं देणार नाहीं.

हेंच तर पाहिजे, आपलेंहि भले होईल, त्याही बिचाऱ्यांची बेकारी दूर होईल. आतां चौथी गोष्ट ही किं, जागजागीं व्याख्यानें करवून, प्रत्येक ठिकाणीं आपली महति पटवून द्यावी लागेल, इतकेंच नव्हे तर वाटेल तें करून आपणच सर्वांत त्या पदांकरितां लायक आहांत हें सिद्ध करावें लागेल. मग त्यामुळें आपले दोस्त दुश्मन झाले तरी चालतील.

अहो या जगांत कोण कुणाचा दोस्त, सर्वच स्वार्थाचा बाजार आहे, मी काय कुणाची पर्वा करतो !

ठीक, ठीक, आतां पांचवीं गोष्ट हीच किं, मतदारांकरितां प्रथम चहापाण्याची व्यवस्था ठेवली तर नंतर एकाद्या पार्टीची व्यवस्था करावीच लागेल.

हेही काय सांगावें लागते ! दूध, तूप, दही, मेवा मिठाई सारे हजर ठेवीन जरूरच पडली तर बाटली सुद्धां, आणि पार्टी अशी देईन किं, शत्रु मित्र वर्षानुवर्षे आठवण ठेवतील.

मग जमलेंच सर्व, आतां राहिला माझा मेहनताना, तो आपण जो योग्य समजाल तो.

त्याची आपण फिकीर करूं नका. मला जाणीव आहे त्याची जो कांहीं खर्च लागेल, तो खुशाल इथून उचलत चला, त्याशिवाय मी मेहनतही फुकटांत जाऊं देणार नाहीं. खर्चाकरितां मागेंपुढें पाहण्याचें कांहींच कारण नाहीं. दहा हजार, वीस हजार, पन्नास हजार या पेक्षां आणखी काय लागणार ?

देवाची मर्जी असेल तर आपण जनसेवक म्हणून जरूर

म्हणले जाल.

देवाची दया तर राहीलच, पण आपलीहि पाहिजे.

हें: हें: हें: ………बरें तर येतो मी आतां.

इतकी घाई ! चहा तर घ्या, पान तरी !

किसन गाडी बाहेर काढायला जरा ड्रायवरला सांग बरें ! बाबूसाहेबांना घरापर्यंत पोंचवून ये ह्मणावें.

चला चार जागीं शिव्या मिळाल्यांत पण एका ठिकाणीं व्याजासहित सर्व वसूल झालें ! पण मोठी आश्चर्याची गोष्ट आहे किं जनसेवक ह्मणवण्याकरितां ज्या अटी ऐकून वैद्यांनीं शिव्या दिल्यांत. वकीलांनी हांकलून दिलें. उपदेशकाची मिजास गरम झाली इतकेंच नव्हें तर सडल्या रांडीनेंहि शिव्यांची लाखोली वाहिली, त्याच अटी-वर मेंबरसाहेब आपल्याला भाग्यशाली समजूं लागलेत ! काय असेल याचें कारण ?

—०—

# आतां कुठें बसावें

गाडीनें मनमाड सोडलें, माझ्या बाजूला कांहीं हिन्दू बसले होते. थोड्या वेळांनंतर त्यांची आपसांत कांहीं चर्चा सुरूं झाली. इस्लाम आणि मुसलमान यांना या देशांतून बाहेर कसें काढतां येईल हा होता, चर्चेचा मुद्दा. खूप लांब लांब गप्पा चालू झाल्यात, पण त्यांचे सार इतकेंच होते किं, मुसलमान हे असें सैतान आहेत आणि इस्लाममध्यें अमुक अमुक वाईट आहे. शीण आला मला त्यांच्या गोष्टी ऐकून, ऐकून तेव्हां पुढल्याच स्टेशनवर मी उतरण्याच्या तया-

रीला लागलो. तेव्हां एकांनीं विचारलें--येवल्याला उतरणार वाटतं आपण ?

मी--नाहीं, जिथे हिंदू बसले असतील अशा डब्यांत मी चाललो आहे बसायला.

त्यांच्यापैकीं एकजण जरा त्रुस्शानेंच म्हणाला--म्हणजे आपण आम्हांला हिन्दू समजत नाहीं ?

मी जरा खेदानेंच म्हणालों--मी आपल्याला हिन्दू कसें समजावें तें आपणच सांगा. हिंदू धर्म हा असा धर्म आहे कि ज्यांत क्रोडो देवतांना जागा आहे ज्याच्या दर्शनशास्त्रांत आस्तिक आणि नास्तिक दोन्हीहि आहेत. पशुबलीपासून तो जलपूजे पर्यंत सर्व तऱ्हेचे पूजा प्रकार ज्यांत अंतर्भूत आहेत. ज्याच्या रक्तांत आर्य आणि अनार्य, शक आणि हूण इत्यादींचें रक्त मिसळलें आहे. हिंदू-मध्यें आलेली प्रत्येक जाति, प्रत्येक धर्म, प्रत्येक संस्कृति ज्या धर्मानें आत्मसात् करून एक हिंदू जाति निर्माण केली तोच तर हिंदू, पण आपल्या चर्चेवरून अशा हिंदुत्वाचा शंभरावा हिस्सा तरी आपल्यांत आहे असें मला वाटत नाहीं. तेव्हां माफ करा मी दुसऱ्या डब्यांतच जातो.

( २ )

दुसऱ्या डब्यांत चढलो तर तेथे कांहीं मुसलमान सज्जन गप्पा गोष्टी करीत बसले होते. मला पाहतांच त्यांच्या गप्पा बंद पडल्यात, पण मी पुस्तक वाचण्यांत रंगून गेल्याचे असा कांहीं आव आणला कि त्यांच्या गप्पाकडे माझें बिलकुल लक्ष नाहीं, अशीच त्यांची खात्री झाली. पाकिस्तान निर्माण करण्याची त्यांची सारी धड-

पड होती. आणि अशा आविर्भावानें त्यांचा वादविवाद चालला होता कि त्यांत पाकिस्तानाची योजना निश्चित झाली तर ब्रिटिश सरकार आणि खुदावंत करीम यांना पाकिस्तान निर्माण करण्यांत कांही अडचण राहूं नये.

एक बंधु म्हणाला—पाकिस्तान झाल्यानंतर आम्हीं हिन्दूना चांगल्या तऱ्हेनें पाहून घेऊं. यांचा मेंदू नीट ठिकाणावर आणून ठेवूं, मग दिसेल राम, कृष्ण, यांची मिरवणूक कशी निघते मंदिरांत पूजा कशी होते ते. अशा गोष्टी ऐकून मला फार वाईट वाटलें आणि दुसऱ्या डब्यांत जावून बसण्याचा मी विचार करूं लागलो. मला उठण्याच्या बेतांत पाहून जरा आनंदानेच त्यांच्यापैकीं एक बंधू म्हणाला—आपल्याला बेलापूरला जायचे आहे वाटते ?

मी—नाहीं जनाब, मला तर फार दूर जायचे आहे. पण अशा डब्यांत बसण्याची माझी इच्छा आहे कि, जिथें मुसलमान बसले असतील.

ती मंडळी जरा दचकलीच, त्यांच्यापैकी एकजण म्हणाला—असें कसें म्हणतां आपण. आम्हीं तर मुसलमानच आहोंत.

मी म्हणालो—माफ करा, इस्लामची जितकी मला माहिती आहे त्यावरून मी असे म्हणूं शकतो कि, खरा मुसलमान जसा पाहिजे. तुम्हीं त्याच्या बिलकूल उलट आहांत. इस्लामचे सांगणे आहे कि खुदानें प्रत्येक देशांत आणि प्रत्येक जातींत धर्मप्रणेते पाठविलेले आहेत. त्या कुणांतच मुसलमान भेद मानीत नाहींत. ते जसे मुहम्मद साहेबांना मानतील तसेच ईसा, मूसा, इब्राहीम

राम, कृष्ण वगैरे सर्वांना मानतील. राम कृष्ण यांच्या मिरवणुकीवर चिडणारे आपण कसे मुसलमान होऊं शकतां ? अशामुळें तर देशांतील सर्व शांतताच नष्ट होईल. इस्लामचा हेतु तर सुखशांति आहे. तेव्हां इस्लामचे नांवावर जर आपण ही बर्बादी करूं इच्छिता तर आपण मुसलमान कसे ? तेव्हां आपण खुशाल बसा. मी दुसऱ्या डब्यांत जातों.

( २ )

दुसऱ्या डब्यांत पाद्रीसाहेब आपल्या भक्तगणासह बसले होते. म. येशूची वचनें उपदेशण्याकरतां ते अहमदनगरला चालले होते. आणि गाडींतही त्यांचा प्रचार चालूच होता. ते सांगत होते. बाप्तिस्मा घेतल्याशिवाय पाप आणि यमयातना यांतून सुटण्याचा दुसरा मार्ग नाहीं. या देशचे लोक फार अडाणी आहेत. यांच्या उद्धाराकरतां आम्हीं करोडो रुपये खर्च करतो, परंतु हे कांहींच समजत नाहींत या देशांतील रहिवासी सर्वचें सर्वच जर ईसाई बनलेत म्हणजे कांहींच झगडा रहाणार नाहीं. देवाच्या मुलाला सोडून खोट्या दैवतांच्या नादी हे लोक लागतात आणि नर्काची तयारी करतात.

मोठ्या उत्साहानें शेजारी बसलेल्या मंडळींना पापमुक्तिचा मार्ग सांगत होते. येथेंहि मला बरें वाटलें नाहीं आणि मी उतरूं लागलो, तेव्हां पादरी साहेबानीं विचारलें—आले वाटते आपले स्टेशन ? मी म्हटले—नाहीं साहेब, स्टेशन तर अजून फार दूर आहे. पण मी दुसऱ्या डब्यांत जातो आहे, तिथे कोणी ईसाई मिळालेच तर त्यांच्या जवळ बसेन नाहींतर दुसऱ्या कोणा धार्मिक मंडळी जवळ

बसन. ईसाई मिळणे तर कठीणच दिसते.

पादरी साहेब जरा हंसून म्हणाले—आपण आतांपर्यंत मी केलेली चर्चा ऐकिली नाहीं वाटते! मी स्वतः ईसाई असून ईसाई धर्माचा प्रचारक आहे. तेव्हां माझ्याहून वरचढ असा दुसरा ईसाई आपल्याला कोठे मिळणार?

मी—शक्य आहे कि, मिळणार नाहीं. पण याचा अर्थ असा होईल कि, जगांत आज ईसाई म्हणून नाहींच, आपली चर्चा मी ऐकली म्हणूनच मला ईसाई मिळणें कठिण दिसते. ईसाई धर्म मला जितका समजला त्यावरून मी असें म्हणूं शकतो कि, प्रेम आणि सेवा शिकविणारा हा धर्म आहे. पण आज तर सारे उलट दिसून येते! आपण म्हणतां हा मुलुख ईसाई झाला तर सर्व झगडे शान्त होतील, पण पूर्ण युरोपखंड आज ईसाई आहे, पण जिथे आज जास्त कहर वर्षून राहिला आहे, तसा जगांत आणखी कुठेंच नाहीं. प्रोटेस्टंट आणि केथॉलिक धर्म मार्तंडांनीं परस्परांच्या ज्या कोट्यावधि बांधवांचे रक्त ज्या निर्दयपणानें सांडलें आहे. ते पाहिल्यावर या जगांत ईसाई म्हणून कुणी आहे अगर मागील शेंकडो वर्षांत होता असें म्हणण्याचे धाडस कोण करूं शकणार आहे? ईसाई आज असते तर जगांत पूंजीवाद माजला नसता, रणचंडीचे असे तांडव नृत्य झाले नसते, आणि मनुष्याची शक्ति एकमेकांना लुटण्यांत नाहीं तर सेवाधर्मांत खर्च झाली असती.

माझा तडाखा ऐकून पादरी साहेबांचे तोंड किती उतरलें याची परवा न करतांच मी तिथून उतरून दुसऱ्या डब्यांत जाऊन बसलो.

( ४ )

आतां माझ्या शेजारी स्वतःला जैन म्हणवणारी मंडळी होती. जैनमुनीच्या दर्शनाला ते लोक निघाले होते. धर्मांत धर्म केवल जैनधर्म आहे बाकी सर्व पाखंडमिथ्या आहे. या धर्मांत जसे शास्त्रीय चमत्कार आहेत तसे कोणत्याच धर्मांत नाहींत. जग विषयांत बुडालेले आहे म्हणून अशा वीतराग धर्माला ती स्वीकारीत नाहीं. जगांतील कोट्यावधि मानव खोट्या धर्मांत फसून नरकांत जाणार आहेत, पण आपण त्याला काय करणार, जसें होणारे असेल तसें होईल.

त्यांच्या तशा गोष्टी ऐकून मी त्यांच्याकडे अगदीं डोळे फाडफाडून पाहिले, मनांत म्हटले काय हे खरोखरीच जैन आहेत. कपडे तर अगदीं श्रीमंती दिसतात. दागदागिनेहि कांहीं कमी नाहींत, हेच का ते महावीरच्या निष्परिग्रहतेचे पुजारी। त्यांच्या बोलण्यांत अनेकान्तांची पुसटती छायाहि मला दिसली नाहीं. त्यांचा अहंकार आणि एकान्तवाद पाहून एकप्रकारचा तिटकारा वाटला मला आणि दुसऱ्या डब्यांत जाण्याकरता मी आंवरा आवर करूं लागलो. तेव्हां त्यांच्यापैकी एकांनी विचारले—इथें उतरणार वाटतं आपण ?

मी म्हटलें—प्रवास तर दूरवरचा आहे. पण इच्छा अशी आहे कीं, थोडा जैनांच्या संगतींत जाईल तर बरा.

ते हंसून म्हणाले—कुठें जाणार आणखी जैन शोधायला आम्हीच तर सारे जैनी आहोंत.

मी थोडे आश्चर्य दाखवूनच म्हणालो—काय आपण सारे जैनी आहांत, निष्परिग्रहतेचे मूर्तिमंत अवतार महावीर स्वामीचे आपण पुजारी आहांत ? तीनशे त्रेसष्ठ मताचा समन्वय करणारे

अनेकान्त मानणारे माझे तर असें मत आहे कि, एकान्तवादच पाखंडमिथ्यात्व आहे. तुम्हीं जर सर्व धर्मांचा समन्वय करूं शकले नाहीं, तर अनेकान्तवादी कसे ? जैनी कसे ? धर्माच्या मोठेपणाच्या बुरख्याआड तुम्हीं अहंकाराचा जप करता तुम्ही अजून अहंकारावर विजय मिळवूं शकले नाहीं. इतकेंच नाहीं तर अहंकारावर विजय मिळवावा ही इच्छा सुद्धां तुमची नाहीं, मग कसे तुम्हीं जैनी ! अहंकारादि शत्रूंना ज्यानी जिंकले तोच जिन, आणि जो जिंकून राहिला आहे किंवा जिंकण्याची इच्छा बाळगतो आहे तोच जैन. तेव्हां आपण कोण आहांत ते कांहीं मला समजलें नाहीं. असें म्हणून त्यांचे उत्तर ऐकण्याचीहि पर्वा न करतां मी डब्यांतून खाली उतरलो.

( ५ )

दुसऱ्या डब्यांकडे गेलो तर तिथें एक पारसी कुटुंब बसले होते. मी दरवाजा उघडला न उघडला तर सारेच ओरडले—इथें नाहीं जागा, इथें नाहीं जागा. मी विचार केला—अशा लोकांजवळ बसण्यांत काय फायदा ? मी आणखी पुढें गेलो.

एक लहानसा कम्पार्टमेन्ट खालीच होता त्यांतच मी शिरलो, एक बौद्ध तेवढे एका बेंचवर आडवे झाले होते. मला पाहतांच त्यांनी ऊठून माझे स्वागत केले. म्हणाले—या पुष्कळ जागा आहे इथं. मी म्हटलें—देवाची दया आपला सहवास मिळाला.

देवाचे नांव ऐकून भिक्षुजी असे दचकलेत कि, जसा एखादा मुसलमान मूर्तिचे नांव ऐकून दचकावा, आणि म्हणाले—या कमबख्त जगाचा जितका सत्यानाश केला आहे तितका कुणीच

केला नाहीं. जो ईश्वराचा गुलाम तो जगाचा गुलाम, जो पर्यंत जगाला हे ईश्वरबाजीचे व्यसन आहे तो पर्यंत त्याचा उद्धार होणें कठिण आहे.

मी—कमीतकमी आपण तर ईश्वराच्या पाठीस लागूं नका.

ते म्हणाले—मी ! मी तर ईश्वर या नांवाचा सुद्धां धिक्कार करतो. मी कशाला त्याच्या पाठीस लागतो. मी बौद्ध, बुद्धाचा अनुयायी, बुद्धीचा बच्चा माझा ईश्वराशीं कांहींच संबंध नाहीं.

मी—सम्बन्ध नसेल तर उत्तमच, पण आपण त्याचा इतका विरोध करता किं रात्रंदिवस तो आपल्या नजरेंत खेळतो, तेव्हां याहून अधिक संबंध तो कोणता ?

भिक्षु—कांहींहि असो पण ईश्वर वगैरे सारख्या अतत्वाला महत्व देऊं इच्छित नाहीं.

असेंच व्हायला पाहिजे आणि म. बुद्धाचीहि नीति हीच होती. ते, ईश्वर परलोक वगैरे कांहींच आदि तत्व मानीत नव्हते. परंतु चार आर्य सत्य तत्वमय जगाचे दुःख करण्यासाठी त्यांचा जन्म होता, आणि आपला जन्म आहे ईश्वराचा बहिष्कार करण्याकरतां हा कांहीं म. बुध्दाचा मार्ग नव्हे.

माझे बोलणें ऐकून भिक्षुजी गप्प झालेत पण प्रसन्न झाले नाहींत, मग अशा विवादमय वातावरणांत बसून मीतरी काय करणार होतो ? निरुपायास्तव डब्यातून खाली उतरलो, आणि प्लेटफार्मवर फिरून विचार करूं लागलो, किं आतां कुठें बसावें ?

# १७ वैद्यराजांचा प्रयोग

वैद्य–हे पहा, औषध देतो मी तुम्हाला, पण पथ्यपाण्याच्या ज्या अटी मी सांगितल्या त्या पाळण्यांत तुम्ही थोडी जरी कसर ठेवली तर मी जबाबदार नाहीं.

रोगी–आपण म्हणाल ते अगदीं कबूल आहे. पण कसेंहि करून माझा जीव वांचवण्याचें श्रेय घ्या.

( कांहीं दिवसानंतर )

रोगी–वैद्यराज कांहींच आराम वाटत नाहीं पहा !

वैद्य–नालायक आहांत तुम्ही, मी सांगीतलेल्या अटीबरहुकूम तुम्ही पथ्यपाणी पाळीत नाहीं, त्याला मी काय करूं ?

रोगी–होईल तितक्या तुमच्या अटी अगदीं अक्षरशः पाळतो.

वैद्य–काय कपाळ पाळतां अटी ? मी तुम्हाला तकली फिरवायला सांगितली होती. फिरवतां तकली ?

रोगी–फिरवतो कधीं कधीं, पण हा अगदीं पोराबाळांचा खेळ वाटतो. फार वेळापर्यंत मन लागत नाहीं.

वैद्य–हां ! म्हणून तर आराम वाटत नाहीं. जोपर्यंत तुमच्या अंगांत पोरपणा येणार नाहीं, तोंपर्यंत आराम नाहीं वाटायचा !

रोगी–पोरंसुद्धां बिमार होतातच ना ?

वैद्य-बरं, बरं ! होत असतील ! तुमची श्रद्धाच नाहीं माझ्यावर तर हा मी निघालो, नेहमीं मी तुम्हांला सांगतो कि, माझा नाद सोडा, मग कां नाहीं सोडीत ?

रोगी–इथं कुणी दुसरा वैद्य नाहीं म्हणून. आराम होवो या न होवो, पण वैद्य असल्यामुळें जरा हिम्मत असते.

( कांहीं दिवसांनंतर )

रोगी–किती दिवस झालेत वैद्यराज पण अझून तिळभर आराम नाहीं हो ! किंवा इतर डॉक्टर वैद्य देतात तसें दुसरे औषध तरी बदलून द्या.

वैद्य–मुळींच नाहीं, मी जुनी औषधं नी जुन्या पद्धति मुळींच मानीत नाहीं. सर्व जुन्या औषधांवर माझा बहिष्कार आहे.

रोगी–पण या आपल्या औषधानें जर आराम होत. नाहीं, तर जुन्या औषधांवर बहिष्कार घालून उपयोग काय ?

वैद्य–उपयोग आज दिसत नसेल, उत्तम रीतिने प्रयोग झाल्यानंतर उपयोग दिसलाच पाहिजे. आणि नाहीं झाला उपयोग तरी हरकत नाहीं, तुम्हांला आराम वाटतो किं नाहीं याची मला फिकीर नाहीं. मला माझ्या प्रयोगाची फिकीर आहे.

रोगी–बस, हात जोडतो मी आतां आपल्याला !

## १८ आग विझव्या

नागरिक–कोणता धंदा करते आपली कंपनी ?

मॅनेजर–आमची कंपनी आगी विझवण्याचा धंदा करते. आग विझवण्याचे मोठमोठे यंत्र आहेत आमच्याकडे.

नागरिक–पण इथं हे जे बॉंब सारखे दिसतात हे काय आहे.

मॅनेजर–हॅं हॅं, हे तर बॉंब आहेत. प्रसंगाविशेषी यांनीं आग लावली जाते.

नागरिक–पण आपले काम तर आग विझवण्याचे आहे मग आग लावण्याची आपल्याला काय जरूर ?

मॅनेजर—त्याचें असें आहे, समजा, पुष्कळदिवसपर्यंत कुठें आगच लागली नाहीं तर मग ? पावसाळ्यांत तर विशेष आग लागतच नाहीं, अशावेळीं आम्हीं या बॉंबनी आग लावत असतो, आणि मग आग विझवण्याच्या यंत्रांनी आग विझवून टाकतो.

नागरिक—पण यांत आपला काय फायदा ? उगीच दुहेरी मेहनत होते. शिवाय लोकांचीहि बरबादी कांही कमी होत नाहीं.

मॅनेजर—तशी तर होणारच, आणि जीवनाकरतां याची गरजहि पण आहे. प्रत्येक मनुष्याला आपल्या जीवनाची आवश्यकता लोकांच्या दृष्टिनें वाढवीत राहिले पाहिजे आम्ही तेंच करतो.

नागरिक—पण य मुळें जनतेचें नुकसान होते. कांहीं कांहींतर अगदीं मातींत मिळून जातात. याचे पाप आपल्याला लागत नाहीं ?

मॅनेजर—पापपुण्याचा हिशेब, आम्हीं आणि आमची कंपनी उत्तम तऱ्हेनें जाणतो. जनतेचे नुकसान तर होतेच, पण फायदाहि होतो. घराला आग लागल्यावर घरची मंडळी व त्या मोहल्यातील लोक सजग होतात. त्यांच्यांत नवजीवन निर्माण होते. अशावेळीं आमची बहादुरी दोघांनाहि खुष करते. त्यांची आणि आमच्या दोघांच्याहि खुषींत पाप कोठें ?

## १९ लज्जायोग्य

त्या दिवशीं शिकागोच्या यात्रेला पुष्कळसे अमेरीकन निघाले होते. गाडीच्या डब्यांत 'शिकागो, शिकागो' म्हणून सारे ओरडून गात होते. त्यांच्यातच शिकागो येथील आपल्या अमेरिकन मित्राला भेटायला निघालेले एक हिंन्दुस्थानीहि होते. अमेरिकेचा इतिहास

विकास इत्यादी विषयावर त्यांची चर्चा चालू झाली. हिंदुस्थानी आपल्या अमेरिकन मित्राला म्हणाला—मला मोठें आश्चर्य वाटतें कि, गोऱ्या लोकांनी अमेरीकेंत रेड इंडियन लोकांवर केलेला अत्याचार, आफ्रिकेतून गुलाम म्हणून आणलेल्या हबशी लोकांवर वर्षवलेला कहर वगैरे प्रकार करतांना स्वतःच्या निर्दयपणाचा, जगाला जो परिचय करून दिला त्याबद्दल त्यांना शरम कशी वाटली नाहीं ? आणि मी पहातो आहे आशीयांत विशेषतः हिन्दुस्थानांत याच गोऱ्या जातीनी जे अत्याचार केलेत त्याबद्दलहि त्यांना लवमात्र शरम वाटत नाहीं.

अमेरीकन सज्जन दार्शनिकतेचा आव आणून गंभीरपणानें म्हणाले—गोष्ट अशी आहे कि, हबशी आणि आशियावासी यांना गोरे लोक लज्जायोग्यसुद्धां समजत नाहींत, आपण यामुळें त्यांना कदाचित् गर्विष्ठ म्हणाल पण ते यांत स्वतःचा गौरव समजतात.

याचे सडेतोड उत्तर हिन्दु गृहस्थाच्या अगदीं जिभेवर आले होते, पण थोडा विचार करून ते चुप बसलत. थोडा वेळ अशीच स्तब्धता राहिली, गाडी आपला रस्ता कांपीतच होती. गोष्ट जरा अधिक झाली असें त्या अमेरिकन गृहस्थाला वाटलें, तेव्हां हा अप्रिय प्रसंग टाळण्याकरितां एकदां नवीन विषय काढण्याच्या ते विचारांत होते तोंच सडकेच्या बाजूला उभ्या असलेल्या एका गाढ-वाच्या जोडावर दोघाचीहि नजर पडली त्यापैकीं एक होता नर व दुसरी मादी आणि त्या खुल्या मैदानांत दोघाचीहि स्वेच्छा काम-क्रीडा चाललेली होती. तेव्हां पहिल्या अप्रिय प्रसंगावर विरजण घालण्याकरितां म्हणून ते अमेरिकन जरा विनोदानें म्हणाले—काय

गाढवांना म्हणावें ! हजारों माणसांनी भरलेली आगगाडी जवळून जात आहे, आसपासची सेंकडों माणसें यांना पहात आहेत आणि हे खुशाल नंगेपणा करताहेत, थोडीशीहि शरम नाहीं गाढवांना !

हिंदुस्थानी सज्जन जरा हँसूनच म्हणाले—गोष्ट अशी आहे कि, गाढव माणसांना लज्जायोग्यसुद्धां समजत नाहींत.

---

## २० जुनें ते सोनें

महागाईनें तर आजकाल नाकांत दम आणला भूतभगतजी. काल तूप घ्यायला गेलो तर मोठ्या मुष्किलीनें साडेतीन रुपये शेर मिळालें, आणि तेही पुनः रद्दी.

भूतभगत—ते कांहीं सांगू नका, तुपाच्या मुष्कीलींतून मात्र मी वांचलो कांहीं दिवसाकरतां.

ज्ञानदास—ते कसें काय ?

भूतभगत—जुन्या अडगळींत तुपाचा एक पिपा मिळाला, वडिलाच्या हातचा आहे तो.

ज्ञानदास—पण आतां त्याचा काय उपयोग ? तुमच्या वडिलांच्या मृत्युला तर आठदहा वर्षे झाले असतील, तेव्हां त्यांच्याहि अगोदरचा तो पीपा असेल आतां काय खाणार ते तूप ?

भूतभगत—नाहींतर काय ! वडिलांच्या हातचे तूप, ते काय असेंच फेंकून द्यायचे ? जुनें असले म्हणून काय झाले ? अहो जुनें ते तर सोनें !

ज्ञानदास—मेहरबान, असूं द्या 'जुनें ते सोनें' पण कृपा करून ते आतां खाऊं नका, जुनें जोपर्यंत चांगल्या परिस्थितींत

आहे, तोपर्यंतच त्याचा उपयोग करावा.

भूतभगत–वाडवडिलांच्या हातची वस्तू ती चांगली काय नी वाईट काय ? तुम्ही माना अगर नका मानूं. पण तुमच्या आमच्या अकलेपेक्षां वाडवडिलांची अक्कल जास्तच होती. त्यांनीं जर एकादी वस्तू ठेवली तर तिच्या उपयोगानें वाईट कधींच होणार नाहीं माझें नांव भूतभगत आहे आणि ते मला वाईट लागत नाहीं तर उलट मला त्याचा अभिमान वाटतो.

ज्ञानदास–अभिमान वाटूं द्या, पण कृपा करून ते तूप मात्र खावूं नका !

भूतभगत–तुम्ही मुळांत नास्तिक आहांत तुम्हांला समजवण्याचा प्रयत्न करणेंच व्यर्थ आहे. वाडवडिलांच्या बद्दल तुम्हांला तिळमात्र अभिमान नाहीं.

भूतभगत–ठीक आहे. मग जशी आपली मर्जी.

( २ )

ज्ञानदास–या, या, फार वेळ केला आज, काहीं काम होतें वाटते ?

रामनाथ–शेजारीं एकाचा मृत्यु झाला, तेव्हां खांदा द्यायला जावें लागलें.

ज्ञानदास–आपल्या शेजारीं कुणाचा मृत्यु झाला.

रामनाथ–भूतभगत तर आपल्याला माहितच असतील ! त्यांचाच मृत्यु झाला, फार सरळ मनुष्य होता बिचारा !

ज्ञानदास–काय ! काय म्हणालांत ! भूतभगत मरण पावलेत ! कशांनीं ! कदाचित् ते जुनें तूपच भोंवलें असेल त्यांना.

रामनाथ–हां, असेंच कांहीं तरी घडलें म्हणतात. पण तुम्हांला कसें समजलें !

ज्ञानदास–अहो, त्या दिवशीं, मी त्यांना फार मनाई केली, पण त्यांनीं कांहीं मानलें नाहीं, होतांच शेवटीं भूतभगत, जुनें ते सोन्याचा शिकार झाला अखेर.

## २१ क्रिया-महात्म्य

मुलें ती मुलें. कोणाला कधीं चिडवावें आणि कधीं चिडवूं नये हे त्यांना कुठलें कळायला ! पंडित रामकृष्णांच्याकडे आज पाहुणे आले होते, त्यांच्याबरोबर ते बाजारांतून येत असतांना, मुलांनी ओरडून म्हटलें–पंडितजी राधेश्याम !

पंडितजी जरा रागावून म्हणाले–काय बडबडतां त्या चोराचें कशाला नांव घेतां ? राम, राम, म्हणा राम, राम ?

मुलें आणखी जोरानें ओरडूं लागलीं–राधेश्याम राधेश्याम !

पंडितजींच्याहि तोंडाचा पट्टा सुरू झाला–मूर्खांनों बेअकलांनों काय बडबडतां ? इत्यादि इत्यादि, आणि मुलें ओरडत होतीं–राधेश्याम राधेश्याम ! या वाग्युद्धांत पंडितजी पराभूत होवून ते चालूं लागलेत. पंडितजींच्या कानांत जोपर्यंत आवाज पोहचूं शकत होता तोपर्यंत मुलें ओरडत होतीं आणि मुलांना आपलें तोंड जोपर्यंत दिसूं शकत होते तोपर्यंत तोंड फिरवून त्यांना धमकावत होते.

घरीं पोंचल्यावर पाहुण्यांनी विचारलें–आपण तर वैष्णव आहांत आणि 'राधेश्याम' म्हटल्यानें चिडतां. हें कसें काय ?

पंडितजी हंसून म्हणाले–चिडत नाहीं मी अहो कोणाच्या

तरी गुरुजींनें मुलांकडून 'राधेश्याम' म्हणवतों भगवंताचे नामस्मरणानें बिचाऱ्यांना मुक्ति मिळेल.

पाहुणे—पण ते तर आपल्याला चिडवण्याकरतां राधेश्याम म्हणतात, आपण परमेश्वराचे नांव घेतो अशी तर त्यांची कल्पनाही नसते. मग कशी त्यांना मुक्ति मिळेल ?

पंडितजी—आपल्याला क्रिया-महात्म्याचा प्रभाव माहित नाहीं.

पाहुणे चुप राहिलेत.

पंडितजी गाईचे मोठे भक्त होते. त्यांनीं घरी एक गाय पाळली होती आणि तिची ते मोठ्या आस्थेनें सेवा चाकरी करीत होते. तिच्या खाण्यापिण्या वगैरेची पूर्ण व्यवस्था केल्याशिवाय ते झोंपत नव्हते.

पाहुण्यांनी म्हटले—गोसेवेच्या पुण्यकर्मांत आज मलाहि वाटे-करी होवूं द्या !

मोठ्या आनंदानें पंडितजींनीं अनुमति दिली. पाहुण्यांनी गाईच्या गोठ्याची खूप साफसफाई केली. आणि खाण्यापिण्याची भरपूर व्यवस्था करून गाईला खुंट्याशी बांधले.

सकाळी पंडितजी ऊठून पाहतात तो गाय खुंटयाला अशी आंखुड बांधलेली दिसली कीं, ती मानहि वर करूं शकत नव्हती त्यांना फार वाईट वाटून ते पाहुण्यांना म्हणाले—तुम्ही गाय इतकी आंखुड कां बांधली ? बिचारीची रात्रभर मान वांकलेली राहिली असेल.

पाहुण्यांनीं म्हटले—मी असा विचार केला कि, मान अशी वांकलेली राहिल्यानें, विनय किंवा नम्रता तिच्या अंगी येईल आणि

त्यामुळें परमेश्वर संतुष्ट होईल !

पंडितजी—अशा नम्रतेनें तर प्राण निघुन जाईल पण परमेश्वर संतुष्ट होणार नाहीं. मनांत हेतु असल्याशिवाय का कुठें परमेश्वर संतुष्ट होण्याची तपश्चर्या होते ?

पाहुणे आश्चर्यानें म्हणाले—अरे आपण तर एका रात्रींतूनच क्रिया-महात्म्यांचा प्रभाव विसरलें !

यावर पंडितजी अगदीं निरुत्तर झालेत.

पण यामुळें तोटा असा झाला किं मुलें चिडवतात तरी पंडितजी चिडत नाहींत, आणि ते तेव्हांपासून एक खळबळ विराम पावून पुष्कळांचे मनोरंजन नाहींसे झाले !

## २२ शास्त्रवचन

पंडित भूतानन्द खोकतच म्हणाले—जमाना काय बदलून गेला, आमचे पूर्वज जसे होते तसे आम्ही नाहीं, आणि आम्ही आहोंत तशी आमची संतति नाहीं. मनुष्याचे किती अधःपतन होणार आहे कोण जाणें ?

'जोपर्यंत प्रलयकाळ येत नाहीं तोपर्यंत ! शंखेश्वरनी भूतानंदाच्या म्हणण्याला दुजोरा दिला.

भूतानंद दीर्घ श्वास सोडून म्हणाले—तसेंच दिसते, कोण जाणे कोणत्या पापामुळें आम्ही अशा काळांत जन्म घेतला. नाहीं कुणांत केसभर त्राण किं, कवडीभर जान !

'आणि पहिल्या जमान्यांत किती ताकद नी किती ज्ञान होते पंडितजी ? प्रो. सुधींद्रानी विचारले.

पहिल्या जमान्यातील काय गोष्ट विचारतां महाराज, अहो श्रीकृष्णांनी करांगुलीवर पर्वत उचलला होता. असे सर्वज्ञ, योगी जागोजागी होते कि बसल्याबसल्या ज्यांना त्रिकाला दर्शन होत होतें, अतां तर त्या गोष्टी निव्वळ स्वप्नवत् झाल्या आहेत. आणि असें म्हणून पंडितजींनी पुनः एक सुसकारा सोडला.

सुधींद्रानें विचारलें—श्रीकृष्णांनीं खरोखरच का गोवर्धन पर्वत उचलला होता ? खरोखरच. कां अशा तऱ्हेचे सर्वज्ञ योगी होते ?

पंडितजी आश्चर्यानें म्हणाले--यांत कांहीं संशय का आहे ? हे तर शास्त्रवचन आहे. शास्त्रवचनांतहि कां कुठें संशयाला जागा असते !

सुधींद्र—शास्त्रवचन संशयातीत असते कि नाहीं ते जावूं द्या, पण शास्त्रांतील वचनांचा अर्थ तर नीट तऱ्हेनें समजायाला पाहिजे ना ?

भूतानंद अर्थात् एक तिळभर फरक नाहीं. शास्त्रार्थ अगदीं उघड आहे.

सुधींद्र—तो तर आहेच पण 'अभिधा' 'लक्षणा' 'व्यंजन' यांचा तर विचार केला पाहिजे, समजा कुणी असें म्हटलें कि 'त्यांनी बुवा वडिलांचे पश्चात् घराचे सारे ओझे आपल्या शिरावर घेतले तर याचा असा नाहीं अर्थ होणार कि, छप्पर आणि भिंती त्यांनीं आपल्या डोक्यावर घेतल्या. किंवा एकाद्याला उत्तरा-दाखल मी म्हटलें समजा कि 'आपण तर सर्वकांहीं जाणतां, मग मला काय विचारतां ? तर याचा अ ा का अर्थ होईल कि माझ्या डोक्यावरचे केंसहि त्यांनीं मोजवले आहेत ?

भूतानंद निरुत्तर होवूनहि म्हणाले--शास्त्रवचनांची अशी टवाळी करण्यांत काय अर्थ आहे ? शास्त्र--तर सर्वांकरितां आहेत त्यांचा सरलार्थच घेतला पाहिजे अक्षराची अदलाबदल किंवा अर्थाचा अनर्थ केल्यानें पाप लागतें पाप !

नंतर सुधींद्र कांहींच बोलले नाहींत, पंडितजींना फराळाचें आमंत्रण द्यायला ते आले होते, तेव्हां जातां जातां ते म्हणाले संध्याकाळीं लवकरच या पंडितजी !

पंडितजींनी होकारार्थी मान हलवली.

संध्याकाळी जेव्हां पंडित भूतानन्द प्रो. सुधींद्राच्या घरीं गेले तेव्हां दार उघडें होतें पण घरांत अजून अंधारच होता, म्हणून पंडितजी जरा बाहेरच थांबले, इतक्यांत आंतून आवाज आला कीं, यावें पंडितजी !

एक पाऊल दाराचें आंत टाकून पंडितजी म्हणाले--अंधार तर खूप पडला पण अजून दिवा नाहीं लावला तुम्ही ?

सुधींद्र--काय जरूरी आहे दिव्याची पंडितजी ! चंद्रप्रकाश तर आहेना.

'चंद्रप्रकाश ?' पंडितजी आश्चर्यानें म्हणाले--अरे आज तर वद्य अष्टमी, संध्याकाळपासून कुठला चंद्र ? आणि असला तरी त्याचा उजेड बाहेर आंगणांत पडेल, घरांत तर दिवाच लावावा लागेल !

सुधींद्र हंसत म्हणाले--चंद्र बाहेर असला तर उजेडहि बाहेर पडेल पण चंद्र घरांतच असल्यावर घरांत उजेड नसायला काय झालें ?

पंडितजी--अरे चंद्र कुठें घरांत असतो कधीं ?

सुधींद्र--घरांत ? अहो प्रत्येक घरीं असतो ज्या घरी नव-यौवना त्या घरी चंद्रमा असलाच पाहिजे.

पंडितजी--चंद्र स्त्रियांच्या मागे लागलेला असतो काय ?

सुधींद्र--अहो मागें कशाला लागेल ? स्त्रीचें मुख हाच चंद्रमा असतो. याचे साक्षीकरतां सारे संस्कृत साहित्य हाजर करतां येईल. आणि शास्त्रवचनांत तर संशयाला कुठें जागाच नाहीं. या, या, आपले स्वागताकरतां माझ्या पत्नीचा मुखचंद्र इथं मज--जवळच उभा आहे. त्या प्रकाशांत आपण खुशाल आंत येवूं शकता !

यावर पंडितजीचा कांहीं आवाज आला नाहीं, तेव्हां त्यांना आणण्याकरतां सुधींद्र बाहेर आले पण पंडितजी तिथें कोठें, दिसले नाहींत.

सुधींद्रानीं मनांतल्या मनांत म्हटलें--आश्चर्य आहे ! शास्त्र-भक्त पंडितजींना शास्त्रवचन इतकें असह्य झालें कि, मी बाहेर येई-पर्यंतहि ते थांबले नाहींत !

## २३ डॉक्टर साहेब

उकीरड्याचीहि कळा पालटते अशी एक म्हण आहे, राम-दास शेठजींची हवेली तयार झाल्यावर तर ही म्हण पूर्ण सार्थक झाली. एके काळीं मोहल्याभऱ्यांतला केरकचरा जिथें पडून उकी-रडा वाढला होता तिथेच आज अती व सुंदर इमारत उभी झाली होती. आजच त्या इमारतीचे उद्घाटन झालें होते. शहरांतील एकूण एक ब्राह्मणांना आज शेठजीकडे आमंत्रण होते. प्रत्येकी दक्षिणा पांच पांच रुपये वांटली गेली.

95240

उत्सवाची धामधूम थांबल्यावर संध्याकाळचे वेळीं शेठजी आपले मित्रमंडळींत गप्पा करीत बसलें होते, आणि 'शहरांतील एकहि ब्राह्मण निमंत्रणांतून सुटला नाहीं' हा होता त्यांच्या गप्पांचा विषय.

शेठजी आपल्या औदार्यावर मोठेपणाचा डौल मिरवण्याकरतां म्हणाले—यापेक्षां दुप्पट, चौपट जरी ब्राह्मण शहरांत असते, तरी मी निमंत्रणावाचून ठेवले नसते.

शेठजींच्या मित्रमंडळींपैकीं एक केशवप्रसाद नांवाचें होते, दोन मित्रांत मतभेद असूनहि ते बाळमित्र होते, लांगूलचालनापासून दोन हात दूर असून शेठजींचे ते खरे हितैषी होते. त्यांनी म्हटलें—तरी पण पुष्कळस ब्राह्मण राहूनच गेलेत !

'राहून गेलेत' शेठजी आश्चर्यानें म्हणाले, 'मी उद्यां बोलावतो त्यांना, त्यांची नांवनिशीवार यादी तर द्या !'

केशवप्रसाद आपलीं बोटें मोजीत म्हणाले—हेपहा, एक तर आहेत आपले कमलबाबू हायस्कूलचे हेडमास्तर, दुसरे आहेत नयनबाबू—तिथलेंच असिस्टंट, तिसरे आपले सुधारकजी—क्रांति संपादक, चौथे आपले........

यादी पूर्ण व्हायच्या आंतच शेठजींसह त्यांचा मित्रवर्ग हंसून उठला, केशवप्रसादच्या भोळेपणाची कींव करीत शेठजी म्हणाले—खूपच सांगितलीत तुम्हीं ब्राह्मणांची यादी, अहो याच शहरांत तुमचा बाळपणापासून काळ गेला आणि अशा निवडक माणसांच्या जातीचाहि तुम्हांला पता नाहीं !

केशवप्रसाद, न हंसता, न खिजता पण ज़रा आश्चर्यानें म्हणाले—मी तर बुवा त्यांची जात बरोबर सांगितली !

शेठजी हंसू दाबीत म्हणाले—वारे तुमचे बरोबर ! अहो त्यापैकीं एक कायस्थ, दुसरे सोनार आणि तिसरे अग्रवाल आहेत, ब्राह्मण तर एकहि नाहीं.

तरीहि केशवप्रसाद हंसले नाहींत किं, वरमले नाहींत, पूर्ववतच म्हणाले—मला नाहीं बुवा ही माहिती. मला फक्त इतकें माहित आहे किं, तुम्हीं सांगता या जातिचे त्यांचे वडील होते.

केशवप्रसादच्या गोष्टीमुळें सर्वांना हंसू तर आलेच पण त्याहून जास्त वाटले आश्चर्य ! शेठजीनी पुनः विचारले—म्हणजे बाप आणि मुलगा यांची जात अलग अलग असते वाटते ?

'कां नाहीं ? जर बापाचा गुणधर्म, स्वभाव, धंदा निराळा आणि मुलाचा निराळा असेल तर त्यांची जात एकच कशी ?'

पण मुलावर संस्कार तर बापाचेच आहेत !

'असतील ! पण आम्हीं अदृश्य संस्कार पहावेत किं, दृश्य योग्यता पहावी ?' केवळ बापाच्या नांवावर एका गाढवाला तुम्ही ब्राम्हण म्हणतां, आणि एका विद्वानाला शूद्र समजतां, हा अन्धेर नाहींतर काय ?'

'हे पहा, यांत कुठेंहि अन्धेर नाहीं. संस्कार ही चीज तुम्हांला वरून दिसणार नाहीं, परंतु ती चिरंतन आणि सखोल असते. अशिक्षित असला तरी ब्राम्हण तो ब्राम्हण आणि प्रोफेसर झाला तरी शूद्र तो शूद्र, डोळे फसवतील माणसाला, पण धर्म नाहीं कधीं फसवणार, संस्कार आणि परंपरा या नाहीं धोका देणार !

तुम्ही हजार प्रयत्न करा पण संस्कार बदलणार नाहीत.

शेठजींच्या या भावनाप्रधान भाषणाला केशवप्रसाद मनांतल्या मनांत हंसले, पण वरून थोडे नरम झाल्यासारखे दाखवून जिज्ञासेनें म्हणाले—म्हणजे याचा अर्थ असा कीं, एक शूद्र प्रोफेसर झाल्यावरहि तुम्हीं त्याचेकडून ज्ञानार्जन करणार नाहीं, त्याचेशी शूद्रासारखाच व्यवहार कराल ?

शेठजी विजयानें म्हणाले—अर्थात् ! मनुष्याची जात समजण्याकरतां चमडी पाहून चालणार नाहीं, पांडित्य ऐकून भागणार नाहीं, तर त्याचेवर घडलेले सूक्ष्म संस्कार पाहिले पाहिजेत, आमचे डोळे धोका देतील, पण ते सूक्ष्म संस्कार कधीच धोका देणार नाहींत.

'ठीक आहे तर आपण संस्कारावरच दृष्टि ठेवा !

या नंतर निराळ्या गप्पांना सुरवात झाली.

( २ )

दुसरे दिवशी सकाळीं जेव्हां शेठजी आपली ही नवीन इमारत न्याहाळीत मोठ्या अभिमानानें उभे होते, तेव्हां एका माणसानें डोक्यावर आणलेली शेणकचऱ्यांची टोपली त्या हवेलीच्या दरवाजांतच रिकामी केली.

त्याचे हे साहस पाहून शेटजी चकितच झाले आणि कठोरतेने म्हणाले—कांरे डोळे फुटले कां ? इथें तू कचरा टाकलास त्या तुझ्या डोळ्यांना ही एवढी मोठी हवेली दिसली नाहीं ?

मनुष्य म्हणाला—शेठजी, आम्हीं तर इथें नेहमीच कचरा

टाकीत आलो ! या मोहल्ल्याचा हाचतर उकीरडा आहे.

'एवढी मोठी हवेली इथें तयार झाल्यावरहि अजून उकीरडा राहिलाच आहे ?'

'जो उकीरडा आहे तो नेहमीं उकीरडाच राहणार शेठजी ! संस्कार काय असे बदलूं शकतात ?

शेठजी आश्चर्य आणि क्रोध यांच्या माऱ्यांत सांपडून म्हणाले–डोळ्यासमोर एवढी मोठी हवेली उभी असतां, आणि कचऱ्याचे कुठें नांवनिशाणहि दिसत नसतां तूं याला उकीरडा म्हणतोस म्हणजे नवल आहे.

डोळ्यांना कांहींहि दिसो शेठजी पण संस्कार ही चीज चिरंतन आणि सखोल असते. समजा एकादा मेहेतर शिकून सवरून प्रोफेसर झाला तरी तो काय ब्राह्मण होणार ? डोळे फसवूं शकतील पण संस्कार नाहीं फसवणार ! परंपरा नाहीं फसवणार ! उकीरडा आहे कि नाहीं हे ठरवण्याकरतां दगड, विटा, चुना पाहून चालणार नाहीं तर या जमीनीवर झालेले सूक्ष्म संस्कार पहावें लागतील !

त्या कचरेवाल्याच्या गोष्टी ऐकून शेठजी मनांत चमकलेच जशी कांहीं त्यांची नशा उतरून गेली नंतर ते त्याला म्हणाले–आपण कोण आहा ?

'याच शहरांत राहणारा एक मामुली मनुष्य आहे मी शेठजी ! '

शेठजी म्हणाले–आपण मनुष्य मामुली असाल पण आपल्या गोष्टी मामुली नाहींत ! बरें केशवप्रसादना जाणतां आपण ?

'होय, ओळखतो मी त्यांना !'

'ठीक आहे तर, त्यांना पाठवून द्या, राहूं द्या हा कचरा इथेंच !'

( ३ )

केशवप्रसाद येतांच शेठजी म्हणाले—यावें डॉक्टर साहेब !

केशवप्रसाद हंसत म्हणाले—एखाद्या युनिव्हर्सिटिचे व्हाईस चॅंसलेरच दिसतां तुम्हीं, गोष्टीं गोष्टींतच मला डॉक्टरची पदवी दिलीत !

'मी काय आहे' हे सोडा पण तुम्हांला पदवी मात्र अगदीं सार्थ, अशी दिली.'

'म्हणजे माझ्या एखाद्या ऑपरेशनमुळें खुष होवून मला ही पदवी दिली कीं काय ?'

'होय महाराज, फारच विचित्र ऑपरेशन, आणि सोळा आणे यशस्वी !'

'कसें विचित्र ?'

डॉक्टर तर जिथेंच जखम असेल तिथेंच चिरा देतात, पण तुम्हीं तर शरीरापासून दूर अंतरावर चिरा दिला पण अगदीं आंतल्यांतला आंतला पूं बाहेर काढला.'

'आपलें कोडें अजून नाहीं समजलें.'

'काम झाल्यावर समजण्याची काय गरज ! चिरा दिला माझ्या हवेलीच्या दरवाजावर आणि, पूं काढला माझ्या हृदयामधला इतकी हिकमत असेल का कोण्या दुसऱ्या डॉक्टरमध्यें !'

नवीन डॉक्टर साहेब फक्त हंसू लागले.

# २४ चिखलांतील कमळ

( १ )

गोस्वामींचे ते ओजस्वी प्रवचन ऐकून श्रोतृवर्ग इतका तल्लीन झाला होता कि, कृष्ण सर्पाच्या फणीप्रमाणें त्यांची मस्तकें डोलूं लागली होती. शुद्धितत्वाचे किती सूक्ष्म विवेचन केले त्यांनीं. साखरेची साल काढून दाखविली जशी ! गोस्वामी जेव्हां म्हणाले—बंधुनों ! तुम्हांला आत्मा शुद्ध ठेवायचा असेल तर शरीर शुद्ध राखले पाहिजे, आणि शरीर शुद्ध राखावयाचे असेल तर मन शुद्ध ठेवले पाहिजे म्हटलेंच आहे 'जैसे खाई अन्न तैसें होई मन' तुम्ही जे अन्न घेतां त्यावर मेहेतराची नजर पडेल तर तुमची विचारधारा मेहेतरास रखीच होईल.

गोस्वामींची तर्कशुद्धता आणि त्यांची धर्ममर्मज्ञता यांची श्रोतृवृंदानें अगदी मुक्तकंठानें तारीफ केली.

( २ )

रोज सकाळीं स्वामीजी दुग्धाहार घेत असत. पण आज दुग्धप्राशणाची वेळ टळून गेली तरी त्यांचा शिष्य बोधानंदानी दुधाचा ग्लास भरून आणला नव्हता. स्वामीजींना फार आश्चर्य वाटले, कारण बोधानंद हा चुकणारा नव्हता कि भुलणारा नव्हता. स्वामींची सेवा करण्यांत तो अगदीं बिनचूक होता. पण आज तो इतका किंकर्तव्य विमूढ झाला कि, स्वामीजीकरतां दूध आणण्याचीहि त्याला आठवण राहिली नाहीं. स्वामीजींनी त्याला बोलावून विचारल्यावर तो नुसताच खाली मान घालून उभा राहिला !

स्वामींनीं संशयानें पण प्रेमपणानें विचारलें–काय झालेरे बोध! दूध नाहीं आणलेंस आज?

बोधानंदानें मान वर न करतांच उत्तर दिले–आज आपल्या-लायक पवित्र दूध मिळूं शकलें नाहीं स्वामी, आणि मोठ्या दुःखाची गोष्ट आहे कीं, पुढेंहि मिळेल कीं नाहीं सांगता येत नाहीं.

स्वामीनी आश्चर्यानें विचारलें–कां? घडले काय असें? आपल्या गाईला कांहीं झाले कां?

बोधानंद–गाईला तर कांहींच झालें नाहीं, पण प्रश्न असा आहे कीं, गाय दोहाची कशी? आणि दोहणारा कोण पहावा?

स्वामी चिंतेनें म्हणाले–म्हणजे? दोहणारा बीमार झाला कीं काय?

बोधानंद–नाहीं स्वामी! तो तर चांगला चंगा आहे, पण तो कसा गाय दोहणार? बरें गाईच्या डोळ्यांवर पट्टी बांधावी तर वांसराला पाहिल्यासिवाय ती तरी दूध कसें देणार? आणि वासरूं तर डोळ्यावर पट्टी बांधूंहि देणार नाहीं.

स्वामी विस्मयानें म्हणालें–अरे आज तुला हा, मूर्खपणा कसा काय सुचून राहिला आहे?

बोधानंद पश्चात्ताप दाखवीत म्हणाला–गुरुदेव, जोंपर्यंत समजत नव्हते तोंपर्यंत ठीक होते, पण आता जाणून बुजून विष कसें खातां येणार?

स्वामी अधीरतेनें म्हणाले–अरे पण काय आहे तें सांगत कां नाहींस? असें कोणतें दिव्यज्ञान झाले तुला आज?

बोधानंद पूर्ववत् नम्रतेनें म्हणाला–मला जे कांहीं समजूं लागले तें केवळ आपल्याच कृपेचें फळ आहे, आणि म्हणूनच मला विचार पडला कि, गाय दोहतांना जर दोहणाराची नजर दुधावर पडली किंवा गाय अथवा वासरांनें दुधाकडे डोळे लावले तर ते भ्रष्ट दूध पिणारांची बुद्धि, दोहणारा गाय, किंवा वासरूं यांच्यासारखी तुच्छ आणि भ्रष्ट होवून जाईल ! तेव्हां काय करावें ? आणि म्हणून मी आज आपल्याला दूध दिलें नाहीं.

( ३ )

सायंकाळची वेळ ! आरती सुरूं होती आणि स्वामीजी गात होते—-

सीताराम जय सीताराम ।
सीताराम जय सीताराम ॥

बोधानंदानें जरा अडखळत अडखळत साथ दिली—

राम....राम....राम....राम ।
राम....राम....राम....राम ॥

आरतीच्या वेळीं तर स्वामीजी कांहीं बोलले नाहींत, पण त्यांनीं बोधानंदाला फटकारलें–कायरे आज तूं भगवंताचे नाम-स्मरण करतांना कांहीं भंगाबिंग घतली होतीस कां ? मी म्हणत होतो 'सीताराम जय सीताराम' आणि तूं कोकलत होतास फक्त "राम–राम–राम–राम'

बोधानंदाने जरा कचरत म्हटलें–गुरुदेव भगवान रामचन्द्राचे नावांबरोबर 'सीतेचे' नांव घेणे योग्य होईल कां ?"

स्वामी जरा तुच्छतेनें म्हणाले—भगवान आणि भगवती काय दोन असतात कां कुठें ? ती सर्व एकच माया आह. आम्हांला जगन्माता आणि जगत्पिता या स्वरूपांत एकाच परमात्म्याचें नामस्मरण करावयाचें आहे, माता-पिता अभेद्य असतात, आणि जरी भेद असला तरी शास्त्रकार म्हणतात कीं, शंभर पित्याबरोबर एक माता असते. तेव्हां तूं सीतामाईचें नांव कां सोडलेस ?

बोधानंद— गुरुदेव आपला उपदेश अगदी बरोबर आहे, पण मी अशा संशयात पडलो किं, जर साधारण मेहतराची नजर लागल्यानें सुग्रास अन्न अशुद्ध होवू शकतें तर महापापी, अधम, दुष्ट रावणाची नजर पडल्यावर सीतामाई कशा शुद्ध राहूं शकतील ! आणि अशी वस्तुस्थिति असतांना भगवंताचे नांवाबरोबर त्यांचे नांव कसें घेतां येईल बरें ?

गोस्वामी अगदीं निरुत्तर झालेत. जरा वेळ त्यांनीं डोळे मिटून घेतलेत, नंतर म्हणाले—बोधानंद तुझ्यावर सत्यनारायणाचा वरदहस्त आहे. म्हणून ज्या सत्याचें दर्शन मला जीवनभर होवू शकलें नाहीं. ते सत्यदर्शन माझ्या असत्य वाक्यावरूनसुद्धां तुला होवूं शकले, खरोखर तूं चिखलांत कमळ निपजलास !

## २५ कालमोह

[ १—का ]

वेरोळ येथील लेणी पाहून झाल्यावर कैलास येथील लेणी पाहण्याकरितां सर्व प्रोफेसरांचा अड्डा तिकडे वळला. प्रो. भूतनाथ चहुंकडे निरीक्षण केल्यावर एक दीर्घश्वास सोडून म्हणाले—धन्य भूतकाळ ! मागील युगांत मानवाकडून जे घडलं त्याचा शंभराया

हिस्सा तरी आजच्या युगांत होऊं शकेल काय ?

प्रोफेसर विवेकचन्द्र म्हणाले–यांत काय संशय, भूतकालांत साधनांचा अभाव असूनहि तेव्हांचे लोक असलें दिव्य, भव्य कामें करूं शकले ही खरोखरच स्तुति करण्यालायक गोष्ट आहे.

प्रो. भूतनाथ थोडे से वक्रोक्तीनेंच म्हणाले–काय तुमच्या त्यांच्या कामाचीच स्तुति केली पाहिजे ? त्यांची अलौकिक बुद्धिमत्ता अलौकिक शक्ति इत्यादि हर प्रकारची अलौकिक योग्यता आणि साधन-सम्पन्नता या गोष्टी काय उपेक्षा करण्यालायक आहेत ? त्यांच्या तुलनेंन आम्ही म्हणजे दर्या में खसखस !

प्रो.–विवेकचन्द्र वाद याढवण्याच्या विरुद्ध होते तेव्हां ते हां मध्ये हां मिळवून मिळाले,–होय तर पूर्वजांच्या साऱ्या गोष्टी स्तुतीला पात्रच आहेत. आज जरी आम्ही बुद्धि आणि साधनें या दृष्टिनें पुढें गेलो असलो तरी आम्ही त्या करितां पूर्वजांचेच ऋणी आहोंत, कारण आमच्या उन्नतिमध्यें त्यांचाच जास्त विभाग आहे.

प्रो.–भूतनाथ जरा नाक चढवून म्हणाले–पूर्वजांपेक्षां पुढें जाण्याची गोष्ट तर राहूंच द्या पण एकाद्याहि गोष्टींत आम्ही त्यांची नुसती बरोबरीहि करूं शकत नाहीं. अशा या भव्य पहाडांत अशीं लांबरुंद खोदकाम आज तुम्हां आम्हाकडून होऊं शकेल काय हे तर सांगा.

यांवर प्रो. विवेकचन्द्र कांहीं उत्तर देण्याचे अगोदरच प्रो. प्रभातकुमार म्हणाले–काय ठेवलं आहे या गोष्टींत–आजच्या युगांत या साऱ्या पोराबाळांच्या गोष्टी आहेत. असल्या निरर्थक कामाकरितां आजचा मनुष्य आपली शक्ति खर्च करायला तयार नाहीं म्हणून !

नाहींतर तो काय करूं शकत नाहीं ? यापेक्षां पन्नास पट दीर्घ बोगदे आजच्या युगांत रेल्वेकरितां तयार झाले आहेत. अहो बोगद्या-मुळें तर अल्प पर्वताच्या या भागाकडून त्या भागाकडे आगगाडी जावूं शकली ! प्रवासाची वं ज्ञानाची साधनें आज जशी उपलब्ध आहेत तशी तर तेव्हां स्वप्नांदि माहित नव्हती.

प्रो. भूतनाथ चिडूनच म्हणाले—ही सर्व पूर्वजांची चोरी आहे. आजच्या मानवाची जनावराहून अधिक लायकी आहे असें मला मुळींच वाटत नाहीं.

प्रो. प्रभातकुमार—पूर्वज म्हणजे हि वानरांचेच अवतार होते कि नाहीं ?

प्रो. भूतनाथ रागानें लाल होवून म्हणाले—म्हणजे तुमचे पूर्वज वानर होते ?

प्रो. प्रभातकुमार—यांत कांहीं शंका आहे का ? दोन हजार वर्षांपूर्वी मानवजातीचे पूर्वज वानरच होते.

प्रो. भूतनाथ—'बन्दर की औलाद' म्हणतांना तुम्हांला शरम नाहीं वाटत ?

प्रो. प्रभातकुमार—यांत कशाची आली आहे शरम ? आमचे पूर्वज वानर होते आणि हळूं हळूं विकास होवून आम्ही मानव झालो तर यांत आम्हांला लाजायचं काय कारण ? शरम आणि लाज त्यांना वाटेल जे बापदादांची कमाई उधळणारे दिवटे निघालेत !

प्रो. भूतनाथ—पोकळ बढाई मारण्यानें आणि बाडवडिलांना नावें ठेवल्यानें कोणी कुलदीपक होत नाहीं.

प्रो. प्रभातकुमार–जे विचार सत्य आहे जन्मांधहि ज्याला पाहूं शकतो–ते कबूल करणें म्हणजे पोकळ बढाई मारणें नव्हे !

प्रो. भूतनाथ–हे तुमचं सत्य आंधळयालाच दिसूं शकेल. भूतकाळांतील तथ्य जाणण्याकरितां मनुष्य चांगला डोळस असावा लागतो.

प्रो. प्रभातकुमार–डोळे उघडून पाहूं लागल्यावर भूतकाळांतील अंधारच जास्त ठळक दिसेल.

हा वादविवाद अधिक लांबेल या भीतीनें कांहीं प्रोफेसरांनीं यावर एक तोडगा काढला, ते म्हणाले–हे पहा नुसत्या वादविदानें या प्रश्नाचा निकाल लागणार नाहीं. एकाचें मत 'जुनें ते सोनें' तर दुसऱ्याचें मत 'नवें ते हवे', तेव्हां याची कांहीं तरी व्यावहारिक परिक्षा व्हायला पाहिजे. कांहो विवेकचन्द्र तुमचें काय मत आहे ?

प्रो. विवेकचन्द्र–अगदी उत्तम, अशी परिक्षाच होणे इष्ट आहे. मी असें सुचवतो कि आपणां सर्वांना एक दिवस प्रो. भूतनाथनी पार्टी द्यावी, त्यांत त्यांनीं सर्व जुन्यांत जुन्या वस्तूचा उपयोग करावा. त्याचप्रमाणे एक दिवस प्रो. प्रभातकुमारांनीं पार्टी देऊन शक्य तितक्या नवीनांत नवीन वस्तूंचा उपयोग करावा. आणि आपण सर्वांनी मिळून मग निकाल जाहीर करावा.

प्रो. भूतनाथ–कबूल, कबूल. पण आम्हां दोघांवरच पार्टी लादून लाडू खायला प्रो. विवेकचन्द्र मोकळे राहूं म्हणतील तर ते नाहीं आम्ही चालूं देणार !

प्रो. विवेकचन्द्र मला कांहीं तुमच्यासारखी परिक्षा घायची नाहीं, पण तुमचा आग्रहच आहे तर मीहि एक दिवस सर्वांची तोंडे गोड करीन.

सर्वजण तथास्तु म्हणून ऊठले.

[ २–ल ]

पुढील रविवारी प्रो. भूतनाथांकडे पार्टी ठरली, सर्व मंडळी पानांवर बसली तेव्हां प्रोफेसर भूतनाथांनी थोडे से वक्तव्य दिले. ते म्हणाले--मित्रांनो, मला मोठा खेद वाटतो कि या मेजवानीकरतां जितक्या जुन्यांत जुन्या वस्तूंचा उपयोग करण्याची माझी इच्छा होती तितक्या जुन वस्तू मिळूं शकल्या नाहींत. माझी इच्छा होती कि मोहेंद्रोजासे येथील खोदकामांत निघालेल्या मडक्यांतील पाणी तुम्हांला पाजावें पण दुर्भाग्यानें ती मडकीं मिळूं शकली नाहींत.

प्रा. प्रभातकुमार मध्येंच म्हणाले--पण वाडवडिलांच्या वेळची मडकीं तर कोणा कचऱ्यांत पडली असतीलच, त्यांचाच उपयोग करायचा होता ?

प्रो. भूतनाथनी स्वगतच उत्तर दिले--आपलें म्हणणें बिलकुल ठीक आहे वाडवडिलांच्या वेळची मडकी असती तर मी डोक्यावर घेऊन नाचलो असतो अशी उकीरड्यांत नसती जावूं दिली. परंतु खेदाची गोष्ट आहे कीं हे घर भाड्याचें असल्यामुळें इथें एकहि वडिलार्जित वस्तू नाहीं.

'शेजाऱ्याकडून मागून घेते' प्रभातकुमार म्हणाले.

प्रो. भूतनाथ—मागण्याची संवय नसल्यामुळ तसें करूं शकलो नाहीं. आणि त्याबद्दल मी आपली क्षमा मागतो. मी येथें

नवीनांत नवीन आणि जुन्यांत जुनें असा संग्रह करण्याचा यथाशक्ति प्रयत्न केला आहे. दोहोंचा आपण रसास्वाद घेतल्यानंतर नवें उत्तम किं जुनें उत्तम याची आपल्याला सहज कल्पना करता येईल.

असें म्हणून वाढण आणि व्याख्यान दोन्हीहि भूतनाथनी सुरू केलीं.

पहा! हा गुलकन्द आहे—एक जुना मुरलेला आणि दुसरा आजच सकाळीं ताज्या फुलांचा ताजा तयार केलेला. आपणच निर्णय करा जुना चांगला किं नवा चांगला, हा आवळ्यांचा मुरंबा एक नवा एक जुना, भातसुद्धां दोन तऱ्हेचा तयार करवला आहे. मोगऱ्यांच्या कळ्यांसारखा फुललेला आहे तो जुन्या तांदळांचा आणि दुसरा मेणपट्टीसारखा आहे तो नवीन तांदळांचा.

प्रो. भूतनाथ पुढें म्हणाले—अशा रीतीनें दोन्ही तऱ्हेच्या थोड्याशाच वस्तु मिळवण्यांत जरी मला यश आलें असलें तरी पण इतक्यावरूनच आपल्याला नवें चांगलें किं जुनें चांगलें हें सहज समजतां येईल.

विवेकचन्द्र आणि प्रभातकुमार यांचे शिवाय बाकी सारेच प्रोफेसर म्हणाले—आपण जे जिन्नस आमचे समोर ठेवलेत त्यांवरून तर जुनेच चांगले असें आम्ही म्हणूं शकूं, आणि आपण जुनेपणाची ही जी वकीली केली त्याबद्दल खरोखरच आपल्याला धन्यवाद!

प्रो. भूतनाथना स्वतःचा गौरव वाटून त्यांचे चेहऱ्यावर विजयाचें स्मित झळकूं लागलें. परन्तु विवेकचन्द्र आणि प्रभातकुमार यांचे स्मित मात्र चेहऱ्यावर उमटूं शकलें नाहीं तरी मनांतल्या मनांत मात्र ते हँसतच होते.

[ ३—मो ]

दुसरेंच रविवारी प्रो. प्रभातकुमार यांचेकडे सर्वांना निमंत्रण होते. व्याख्यान न देतां आणि व्याख्या न करतां प्रोफेसर मजकुरांनीं चटपट वाढायलाच सुरवात केली. जुन्या सडक्या पत्रावळीवर वाढण वाढलें गेले. सडल्या तुपाचा वास सर्वांच्या मस्तकांत शिरल्यामुळें चक्कर येवूं लागलेत जुन्या बुरसलेल्या मडक्यांतून हौदांतील पुष्कळ दिवसांचे शिळे सांचलेले पाणी भरण्यांत येवून तेंच पिण्याकरतां देण्यांत आले, वाढण पूर्ण होण्याच्या अगोदरच हा सारा प्रकार पाहून प्रोफेसर कम्पू ओरडून उठला किं, 'आम्हांला ठार मारण्याकरतां तर तुम्ही आमंत्रण दिलें नाहींना ?'

अत्यंत गंभीरतेनें प्रभातकुमार म्हणाले—शक्य आहे आपण म्हणतां तें, पण माझा मात्र तसा हेतु नव्हता. केवळ जुनेपणाचे गुणधर्म आपल्याला कळावेत हीच प्रामाणिक इच्छा होती. ही मडकी आमच्या पूर्वजांच्या वेळचीं, म्हणजे फारच जुनी आहेत, इतके जुन्या काळचे पाणी मला नाहीं मिळूं शकलें तरी गेल्या रविवारीच आणि तेही आमचे येथील जुन्या हौदांतले पाणी यांत भरून ठेवले होते. कारण ताजें पाणी आपण कदाचित् पसंत करणार नाहीं असा माझा समज होता. तूप देखील फार जुनें नाहीं मिळूं शकले ४—५ वर्षांपूर्वीचेच मिळाले. वीस एक वर्षांपूर्वीचे तूप जर मिळाले असते तर आपण विशेषतः माझे परम मित्र प्रो. भूतनाथ यांना फार आनंद झाला असता. जुन्यांत जुन्या वस्तू मी मिळवूं शकलो नाहीं याबद्दल आपण मला क्षमा कराल. आणि जे कांही आपल्यासमोर मी ठेवूं शकलो यांत आनंद मानाल अशी मला दृढ आशा आहे.

सर्व प्रोफेसर ओरडून उठलेत–चुलीत गेला तो जुनेपणा. खाऊं घालायचे असेल तर हे सारें फेकून द्या आणि चांगले ताजे पदार्थ आणा.

प्रो. प्रभातकुमार मनांत हंसून पण पूर्ववत गंभीरतेने म्हणाले– जशी आपली मर्जी. असें म्हणून त्या सर्व वाढलेल्या पत्रावळी फेकण्यांत आल्या, आणि कोऱ्या मडक्यांतील ताजें पाणी, ताज्या तुपांत तळलेल्या ताज्या जिनसा, ताज्या पानांच्या हिरव्यागार पत्रावळी ताजी फळफळावळ यांनी सर्वांचे आनंदाचे जेवण सुरू झाले. पण भूतनाथ मात्र म्हणालेच कि सर्व पदार्थ तर ताजे आहेतच गुलकन्द मुरब्बा भात हाहि ताजाच पाहिजे होता.

प्रभातकुमारांनी उत्तर दिलें–हे जिन्नस गेल्या रविवारी आपले घरीं खाण्यांत आल्यामुळें जुने झाले आहेत.

'पण आपले घरीं तर ती नवी बनू शकत होती' भूतनाथ म्हणाले.

पण सर्वांचे लक्ष्य पात्रावर असल्यामुळें ही चर्चा पुढें वाढली नाहीं. आनंदाने जेवण वगैरे होऊन सर्वांनी, प्रभातकुमारांना धन्यवाद दिलेत.

[ ४–ह ]

पुढील रविवार विवेकचन्द्रवर पडला. सर्व कम्पू मेजवानीकरितां गोळा झाला होता. त्यांनीं जुना मुरलेला मुरब्बा, मुरलेला गुलकन्द जुने तांदळांचा भात, तेल मुरलेले लोणचें, ताजे तूप, ताजे पाणी, ताजी फळफळावळ असा सुंदर बेत केला होता. जुन्याचे अगर नव्याचे असे ते कुठलेच पक्षपाती नव्हते. जे जुने जिन्नस

चांगले ते जुने घेतले व जे नवीन चांगले ते नवीन घेतले. तक्रार करायला कुणालाच जागा ठेवली नाहीं. त्यांना जेवणाची नाहीं वकीली करावी लागली कि व्याख्यान द्यावें लागले.

खाद्य पदार्थांची सर्वांनी मुक्तकंठाने स्तुति केली आणि म्हणाले मि. विवेकचन्द्र शेवटी खरोखर जय आपलाच झाला.

'तो कसा काय ?' विवेकचन्द्रांनीं विचारलें.

प्रो. भूतनाथांनीं मेजवानीकरतां फार मेहनत घेतली पण ते जुनेपणाच्या मोहानें पछाडले गेल्यामुळें पाहिजे तसे जेवण मिळूं शकले नाहीं. तीच गत प्रभातकुमारांची, त्यांच्याहि नवेपणाच्या मोहामुळें थोडया उणीवा राहिल्याच, पण तुम्ही आज जो बेत केलांत तो मात्र जुने किंवा नवे यांचा अभिमान न धरल्यामुळें सर्वांगपूर्ण स्वादिष्ट, आणि मजेदार झाला. हा आहे निर्मोहता आणि निरभिमानता यांचा परिणाम.

प्रो. विवेकचन्द्र नंतर नम्रतेनें म्हणाले—माझे प्रांजळ मत असें आहे कीं ! जुनें कांहीं सर्वच वाईट नाहीं आणि नवे कांहीं सर्वच चांगले नाहीं. दोन्ही मध्यें बरें वाईट गुणधर्म आहेत. खरी-गोष्ट अशी आहे कीं 'विवेक' हा प्रधान असून प्रत्येकांनी त्याचा दास बनले पाहिजे.

सर्वजण—एकदम पसंत आहे आम्हांला आपला हा निरतिवाद.

प्रो. भूतनाथ—पुढील रविवारचे आणखी निमंत्रण मिळत असेल ही पसन्ती दुप्पट होईल.

एक प्रोफेसर—मग ही निमंत्रणाची सुरवात पहिल्यासारखी

पुनः आपल्यापासूनच होऊं द्याना.

हास्याचा एकच ध्वनि उठला.

---*---

## २६ जुलाब

वैद्यराजांची कीर्ति फार दूरवर पसरली होती, त्या शहरांत त्यांचे इतका धर्म-धुरंधर, वर्णाश्रम धर्माची पदोपदी ग्वाही देणारा आणि प्रत्येक रुढीचें आपले रक्तानें रक्षण करणारा दुसरा कोणी नव्हताच.

त्यांचा एक मित्र त्यांना भेटायला आला. तो होता सुधारक, गरम चहाच्या सलामीनें दोघांची गरमागरमी वादविवाद सुरूं झाला.

सुधारक जीव तोडून सांगत होता रूढी व धर्म बाह्य व्यवहार या सर्वांना गरज पडेल त्या प्रमाणे जरूर बदलले पाहिजे. जे नवीन आहे जे ताजे आहे त्यांना आत्मसात केले पाहिजे.

कोणतीहि वस्तु जीर्ण झाली, सडली, किंवा त्यांतील सार निघून गेले कीं ती फेंकून द्यावी लागते—दूर करावी लागते—यांत तर दुमत असण्याचे कारणच नाहीं.

परंतु वैद्यराज ठांसून पुनः पुनः सांगत होते कीं जे चांगले आहे ते नेहमी चांगलेच राहणार, चांगल्याचे वाईट कधींच होणार नाहीं. म्हणून एकवार जे ग्रहण केले त्याचा त्याग कधींच करूं नये, स्वमत पोषक त्यांची श्रद्धाहि इतकी अढळ होती कीं ते कोणतेहि तर्कशास्त्र मानायला तयार नव्हते.

इतक्यांत एक बाई आपल्या मुलाला घेऊन तिथे आली आणि सांगूं लागली कीं हा परवापासून शौचालाच जात नाहीं.

वैद्य– 'कायरे बाळ तुला शौचाला होत नाहीं काय ?'

बाळ– 'होते पण मी आंवळून धरतो.'

वैद्य– 'म्हणजे' मग तूं मुद्दाम शौचाला जात नाहीस तर' कारे कारण काय ?

मुलगा थोडा शरमिन्दा झाला पण नंतर म्हणाला.

'मी परवा मिठाई खाल्ली होती, फार चांगली होती ती'

'अरे पण खाल्ली तर काय झालं ? मिठाई खाल्ल्यावर शौचाला जावूं नये का ?

'नाहीं तसं नाहीं पण मिठाई चांगली होती तशी पुनः मिळणार नाहीं, मग अशी उत्तम मिठाई काय म्हणून मी पोटांतून बाहेर काढूं ?

'अरे मुर्खा मिठाई काय पोटांत अजून तसची तशींच राहिली ? त्याचा रस रक्तांत मिसळून गेला असल आणि बाकीचा नीरस भाग विष्ठा झाली असेल, मग मिठाई राहिली कोठे ?

'पण परवाच तर खाल्ली होती.'

'अरे पण शहाण्या परवा परवा आहे आणि आज आज आहे. कोणताहि गोष्ट काय नेहमी सारखीच राहते ? जा हा जुलाब घे नी शौचाला जा ! आणि त्याला शौचाला जुलाब दिला गेला.

मित्र– वैद्यराज आपण दुसऱ्याला तेवढे जुलाब देतां स्वतः मात्र घेत नाहीं. आतांचेच उदाहरण.

वैद्य लज्जित होऊन म्हणाले नाहीं नाहीं. माझी चूक होत होती ती लक्षांत आली माझ्या, आज पासून मी जरूर जुलाब घेत जाईन.'

# २७ लाठी बनाम कानून

कलकत्ता मेल सुटायला दोन तीन मिनिटेंच बाकी उरली होती. ठाकूर साहेब आपली कानाइतकी उंच लाठी खांद्यावर टाकून झपाट्यानें पावलें टाकीत पहिल्या वर्गाच्या डब्यासमोर येवून थडकले हमालाकडून घाईघाईनें सामान डब्यांत चढवून त्याची त्याला मोकळें केलें, आणि मग सुटकेचा दीर्घ निःश्वास टाकला. जसें कांहीं गाडी मिळण्याची आशा तर नव्हती पण मिळाली.

आतां गाडी सुटायला कांहीं सेकंदच फक्त उरले होते, इतक्यांत मुंबईपासून त्याच डब्यांत प्रवास करीत आलेला एक गोरा, ऐन शेवटच्या क्षणाला डब्यांत येऊन दाखल झाला. समोर पाहतो तों हिंदुस्थानी—काला आदमी—आणि तोही लाठाबाज खेडवळ! साहेब मजकूर नुसते चकीत न झाले नाहीत, तर त्यांच्या रागाचाहि पारा आश्चर्याबरोबरच वर चढूं लागला, पराकोटीची चीड उत्पन्न होवून साहेब मजकूर, ठाकूर साहेबाला फटकारूं लागले—

'ओ मेन टुम इधर कहां आगया ? क्या नहीं जान्टा कि यह साहब का डब्बा है ?'

ठाकुर साहेब थोडेसे चकित होऊनच म्हणाले 'हा साहेब लोकांचा डब्बा आहे हे तर नव्हते माहित, पण हा पहिल्या वर्गाचा डबा आहे हे मात्र माहित आहे मला.

आणि ठाकूर साहेब इतके बोलले मात्र, साहेबांचा पारा सीमापार होवूं लागला. कारण ठाकूर साहेब गैरसमजानें नाहीं, तर समजून उमजून तेथें बसले होते. एक हिंदुस्थानी एका इंग्रजाबरोबर बसण्याचा उद्धटपणा करतो म्हणजे काय गोष्ट आहे! कोणता

इंग्रज याला त्यावेळीं सहन करील! साहेबांनीं आपल्या स्वराला जास्त तीक्ष्ण केले आणि म्हटले—"जब तुम जान्ता ठा कि यह पहिले दर्जे का डब्बा है, टब टुम इसमें क्यों बैठा ?"

'क्यों म्हणजे ? माझ्याहि जवळ पहिल्या वर्गाचे तिकीट आहे म्हणून !' ठाकूर साहेब पूर्ववत् गंभीरतेनेंच म्हणाले.

गोरा एकदम ओरडून उठला—टिकिट हाय टो क्या झाला. टुम काला आदमी, क्या एक साहाब के बराबर बैठेगा ? उठ जाव नीचे को बसो, नहीं टो हम गाडीमें से फेंक देगा.

पण ठाकूर साहेब बर्फासारखेच थंड होते, इतकेच नव्हे तर उलट किंचितसे हंसतहि होते. आणि हे दृश्य पाहून, साहेब मजकूर ताडकन् उठले, आणि त्यांनी ठाकूर साहेबांना जमीनीवर आपटण्याच्या उद्देशानें झटकन त्यांचा दंड पकडला.

अंगाला हात लागायचीच खोटी, ठाकूर साहेब आपल्या जाग्यावरून उठले तेच अशा कांहीं ढंगानें कि त्यांच्या धक्कयानें साहेब मजकूर जमीनीवर धाडकन लोटांगण घालूं लागले, त्यांना उठण्याकरतां क्षणाचीहि सवड न देतां ठाकूर साहेब त्यांच्या उरावर दणदिशी जावून बसले. बराच वेळपर्यंत मासळीसारखे हातपाय हालवून साहेब मजकूरांनी पकडींतून सुटण्याचा प्रयत्न केला, पण जेव्हां त्यांची खात्री पटली कि, हा काला आदमी खराखरच लोखंड आहे, आणि आपली धडपड व्यर्थ आहे, तेव्हां ते म्हणाले 'अच्छा मेन अब हम टुमे माफ कर्टा है, टुम अपने जगेपर बैठ जाव

पण ठाकूर साहेब लागेच म्हणाले, नाहीं साहेब आतां तर आपल्या हुकमाप्रमाणें मी आपल्या जागेवरून उठून खालीं जमीनी-वर बसलो आहे, तेव्हां आतां असाच बसणार.

गोरा साहेब 'ओह टुम बहोट मजाक करटा है—अच्छा, अब टुम हमको छोड डो, हम टुमको डोस्त मानेगा.

दोघंहि उठून उभे झालेत, आणि साहेब मजकूरांनी शेकहँड केला, आणि म्हटल 'हम ताकद की कद्र करटे, लाठी को हम कीमटी चीज समजटे.

ठाकूर—'पण माणुसकी ही तर न्यायाची किंमत करते'. साहेब मजकुराला हा शालजोडी मधला समजला की नाहीं कुणास ठाऊक, पण त्यांनीं नुकतेंच हूं म्हटले.

त्या मधल्या स्टेशनवर मेल कांहीं फार वेळ थांबणार नव्हती, तेव्हां झालेल्या प्रकारावर पोतेरे फिरण्याकरतां जोरजोरानें हंसून साहेब मजकूर ठाकूर साहेबांशी विनोद करूं लागले. मजेमजेतच त्यांनी ठाकूराची ती लाठी उचलली आणि म्हटले, 'वाह ही लाठी तर तुम्ही खूपच छान बाळगली बोआ. पण या अशा लांबलचक बजनी लाठीचं अखेर काय करणार आपण ?'

ठाकूर—" साहेब, मी किरसान माणूस, अशा लाठी शिवाय माझे चालूंच शकत नाहीं. माझा मुलगा शहाणपणाची पुष्कळ बढाई मारतो, पण जनावराशी त्याचे पांडित्य कांहींच करूं शकत नाहीं".

साहेब—पांडित्य कसें काय ?'

ठाकूर—" माझा मुलगा शिकतो बी. ए. मध्यें, या सुटींत तो आला आहे घरीं, आणि आल्याबरोबर त्यांनीं आमच्या वाड्यांत, जागजागी नोटीसा लावून दिल्यात. कुठें लिहिलें आहे 'नो एड-मिशन' तर कुठें 'फूल तोडूं नका' कुठें कांहीं तर कुठें कांहीं. पण ह्या त्याच्या नोटीसा लागूनसुद्धां, गाई, बैल, घोडे, गधे वगैरे

जनावेर बागेची नासाडी करतातच. त्याच्या नोटीसाला तर ते मानी-तच नाहींत, पण माझी ही लाठी पाहिली रे पाहिली कीं दुरूनच पळ काढतात. डंडयाशिवाय आपण दुसऱ्याची जमीन तुडवूं नये, इतकेंहि त्या गाढवांना कळत नाहीं.

गोरा साहेब—'न्याय आणि समजूतदारपणा यांची आशा, गाढवांकडून करणें फुकट आहे. ते काय न्यायाची किंमत करणार !

ठाकुर साहेब—"हां, बरोबर आहे, त्यांना तर ठोसाच पाहिजे. न्याय आणि माणुसकी ह्याची किंमत गाढव काय करणार."

—*—

## २८ परीक्षेची योग्यता

पंडितजीचे व्याख्यान अगदीं आवेशांत चालले होते. ते सांगत होते कि—पहा, धर्माची गति फार सूक्ष्म आहे. शास्त्रांचे मर्म अगाध आहे. गुरुजनांचे ज्ञान असीम असते. श्रद्धा हीच मनुष्याला पैलतीरी नेऊं शकते, म्हणून कोणतेंहि काम श्रद्धेनें करा. आज-कालच्या तरुणांची बुद्धि इतकी थोडी असते तरी ते आम्ही गुरु-जनांची—शास्त्रांची परीक्षा करण्याचे धाडस करतात.

यानंतर, ब्राह्मण जातीची श्रेष्ठता, गुणहीन ब्राह्मणाची पूजा. साधुवेषधाऱ्यांची श्रेष्ठता, अमुक अमुक अमुक जातींचा विटाळ मानण्यांतील धार्मिकता इत्यादि बाबींचा लंबा चौडा उपदेश पंडित-जींनीं ऐकवला.

व्याख्यानांत एक तरुण बसला होता, त्यानीं वादविवाद सुरू केला, परंतु पंडितजीकडून त्याच्या शंकांचें समाधान होईना, तेव्हां

ते जरा रागावून म्हणाले—मी जे सांगतो ते शास्त्राला धरून सांगतो शास्त्रावर अविश्वास करता ?

'शास्त्राच्या ज्या गोष्टी खऱ्या आणि हितकारक वाटतात त्या-वरच मी विश्वास ठेवतो. पण ज्या गोष्टी खोट्या त्यांच्यावर कसा काय विश्वास ठेवायचा ?'

'म्हणजे तुम्ही शास्त्राची सुद्धां परीक्षा कराल तर ?'

'कां नाहीं ? परमेश्वरानें बुद्धि दिली, ती कशाकरतां' ?

'शास्त्रांची परीक्षा करण्याकरतां बुद्धि दिली ?'

'शास्त्रच काय, पण प्रत्येक गोष्टींचा भलेबुरे पणा अजमा-ण्याकरतां बुद्धि दिली आहे.'

'आजकालचे तरुण असेच ! धड एक श्लोक तर रचतां यायचा नाहीं आणि शास्त्रांची परीक्षा करायला तयार ! जसे कांहीं परीक्षा घेणारे शास्त्रकारांचे गुरूच लागून राहिलेत !'

'पण परीक्षा करण्याकरतां श्लोक रचण्याची काय जरूर ?'

'पण शेठ धनपतीरायनी नजरेच्या इशाऱ्यानें त्याला दाबले. तरुणाचे नांव ज्ञानदास होते, आणि धनपतराय त्याचे वडील होते. पंडितजींचे प्रवचन असलेला हा उत्सव धनपतीरायनींच करवलेला होता.

ज्ञानदास असा चुप बसलेला पाहून पंडितजींना जरा जोर येवून ते म्हणाले—हे पहा, परीक्षक होण्याकरतां परीक्ष्य व्यक्तीहून त्या विषयाचे आमचे अध्ययन जास्त पाहिजे. अध्यापकच विद्या-र्थ्यांची परीक्षा घेवू शकतो. ज्याची ज्या विषयांत योग्यता नाहीं, त्याची तो परीक्षा कशी घेणार ? आमची बुद्धि प्राचीन ऋषी महर्षी-

हून कमी आहे हे अगदीं स्पष्ट आहे. असें असतां त्यांची अगर त्यांच्या रचनांची परीक्षा आम्ही कशी काय करूं शकतों ?

सर्वजण म्हणाले—अगदीं खरी गोष्ट महाराज !

पंडितजींनी चहूंकडे आपली विजयी मुद्रा फिरवली.

( २ )

रात्रीं श्रीकृष्णाच्या आरतीनंतर भजनाचा कार्यक्रम होता. याकरितां बाहेर गांवाहून उत्तमोत्तम गवैयें बोलावलेले होते. शिवाय गायनकलेंत जो जसा तरबेज ठरेल त्याला तसे इनाम देण्याचेंहि ठरवले होते. परीक्षेचा निर्णय श्रोत्यांवर सोंपवलेला असून पंडितजी त्यांत मुख्य होते. अशा रीतिनें गवैय्यांचा निर्णय पंडितजींच्या हातीं आला होता.

भजनानंतर गवैय्यांची नांवनिशी पंडितजींनीं यथाक्रम जाहीर केली. ज्याचे गाणें सर्वांत उत्तम वठले होते त्याचा अनुक्रम प्रथम घेतला गेला, आणि बाकिच्यांची नांवेंहि अशीच क्रमवार घेतली गेलीत. आणि पंडितजींच्या या परीक्षानिर्णयाला श्रोत्यांनींहि पाठिंबा दिला.

पंडितजींच्या निर्णयानुसार गवैय्यांना जेव्हां इनाम देण्यांत येवूं लागला. तेव्हां ज्ञानदास मध्येंच म्हणाला—जरा थांबा ! अशा वेळेला पंडितजींचेंहि एकादे गाणें झालें पाहिजे.

पंडितजी किंचित् हंसून म्हणाले—भैया ज्ञानदास मी कसें काय गाणार ? मला तर मुळींच गाता येत नाहीं !

ज्ञानदास मोठ्या नम्रतेनें हाथ जोडून म्हणाला—पंडितजी असें कसें होवूं शकेल ! आपण तर या मोठमोठ्या गवैय्यांची परीक्षा

घेवूं शकले, त्यांचा अनुक्रम ठरवूं शकले, आणि आपल्याला गातां येत नाहीं, हें कुणाला बरें खरें वाटेल ?

एकजण चेष्टेनेंच म्हणाला—हे चांगले आहे ! उद्यां जर पंडितजी लाडवांची परीक्षा करतील तर त्यांनां बल्लवाचार्यांचीच जागा दिली पाहिजे, कारण पाकाची परीक्षा करणारे हे पाकाचार्यच ठरतील !

हे उत्तर ऐकून पंडितजींना आंतून मोठा आनंद झाला. आणि ते हंसतच म्हणाले—छान ऐकवलेंत बुवा आपण ! हे पहा ज्ञानदास गायनाची परीक्षा करण्याकरतां गायनाचार्य असण्याची कांहींच जरूरी नाहीं. आणि पाकपरिक्षेकरतां पाकाचार्य बनण्याचीहि जरूरी नाहीं. फलाफल, किंवा बऱ्यावाइटाचें संवेदन या गोष्टीनें यांची परीक्षा सहज होवून जाते.

ज्ञानदास पुनः हात जोडून म्हणाला—शास्त्राची परीक्षा करण्याकरतां जर श्लोक रचण्याची लायकी पाहिजे तर गायनाच्या परीक्षेकरतां गायनाचार्यांची लायकी कां नको ? आपण तर सांगितले होते कि परीक्षक बनण्याकरतां परीक्ष्य व्यक्तिहून जास्त लायकी असावी लागते म्हणून ! मग आपला कोणता सिद्धांत खरा मानावा ? फलाफल म्हणजे समाजाच्या हितावरून शास्त्राची परीक्षा नाहीं का होवूं शकणार ?

पंडितजींचा चेहरा पाहण्यालायक झाला, आणि चहूंकडून हास्याचे फवारे उडूं लागलेत.

—*—

# २१ मेजवानी

विवाहाप्रित्यर्थ म्हणून ज्ञानचंदने आपल्या मित्रांना एक मेजवानी दिली होती. ज्ञानचंद सत्यसमाजी असल्यामुळें, त्याच्या मित्रमंडळींत हिंदु मुसलमान, ईसाई वगैरे सर्वांचाच भरणा होता. जेवणाला जरा वेळ होता म्हणून दिवाणखाण्यांत सर्वांच्या गप्पा सप्पा चालल्या होत्या.

मिय्या जफरुल्लाखां म्हणाले—एका हिंदुच्या घरीं मेजवानीला येण्याचा माझ्या आयुष्यांत हा पाहिला प्रसंग आहे.

मि. जेम्स म्हणाले—हिंदु मेजवानीची रुची मलाहि आजच प्रथम चाखायला मिळणार आहे.

शिवप्रसाद म्हणाले—हिंदू पद्धतिची मेजवाणी मिळेल पण त्यावरून तुम्ही असें नका समजूं कीं, एका हिंदूचे घरीं तुम्हांला मेजवानी मिळाली.

जफरुल्ला—म्हणजे ज्ञानचंदजी हिंदू नाहींत कीं ?

शिवप्रसाद—ते त्यांनाच विचारा !

इतक्यांत ज्ञानचंद्र आंतून दिवाणखाण्यांत आलेत तेव्हां जफरुल्लानें विचारलें—हे पहा ज्ञानचंदजी आमच्या एका प्रश्नाचे उत्तर तर द्या.

ज्ञानचंद पुनः आंत वळतांना म्हणाले—हे पहा मंडळी आणखी थोडा वेळ अशाच गप्पा चालूं द्या, आपण जाणतांच आहां किं, गृहदेवता अगदींच नवीन असून तिसरा कोणी मनुष्यहि मदतीला नाहीं. म्हणून नाइलाजास्तव मलाच हातभार लावणं भाग आहे.

मि. जेम्स हंसून म्हणाले—अरे बाबा जरूर हातभार लाव !

घाई कशाची आहे अजून तास दोन तास आम्ही मजेंत थांबु शकतो, पण फक्त इतकेंच सांग तूं हिंदू आहेस कि नाहींस ?

ज्ञानचंद म्हणाले—सत्यसमाजी आहे म्हणजे सर्वच आहे. हिंदू, मुसलमान आणि ईसाईसुद्धां आहे.

असें म्हणून ज्ञानचंद तर आंत निघून गेलेत पण मित्रमंडळी एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागली.

जफरुल्ला खां—ही काय भानगड आहे ? असें तर कधींच नाहीं ऐकलें !

शिवप्रसाद—तर आतां ऐकून घ्या ! ज्ञानचंदच्या गुरूनें शिकवले कि, प्रत्येक हिंदूला मुसलमान आणि ईसाईसुद्धां झालें पाहिजे, तद्वतच प्रत्येक मुसलमानाला हिंदू आणि ईसाई झाले पाहिजे. ज्ञानचंदने स्वतःला असेंच मानले आहे आणि बनवले आहे. पहाना कसे निरनिराळ्या मित्रांना त्यांनीं मेजवानीचे निमंत्रण दिलें, काय खां साहेब अशींहि भानगड तुम्ही कधी पाहिली नसेल !

खांसाहेब मान हालवून म्हणाले—हूं गोष्ट तर ठीक आहे पण ज्ञानचंदचे नांव तर हिंदूच आहे,

शिवप्रसाद— अँ, आपण त्यांना ज्ञानचंद न म्हणतां 'अक्ल का चांद' म्हणा, आणि मि. जेम्स 'दि मून ऑफ नॉलेज' म्हणूं शकतात, ज्ञानचंदजींना वाईट नाहीं वाटणार त्यांत, कारण ते ईश्वर अल्ला, गॉड खुदा अशा सर्वच नांवाचे ध्यान करतात.

मि. जेम्स—ध्यान तर बुवा एकाच नांवाचे उत्तम होते.

शिवप्रसाद—एकाचेच तर आहे, नांव बदलल्यानें अर्थ कां कुठें बदलतो !

मि॰ जेम्स–कां नाहीं बदलत ?

शिवप्रसाद–वाः ! मग खांसाहेब केवळ 'आदमी' राहतील, तुम्ही फक्त 'मॅन', आणि मी निव्वळ 'मनुष्य' मग आम्हां तिघांत नाहीं राहणार आदमियत न मॅनलीनेस न मनुष्यता !

मि॰ जेम्स थोडे से खजील झाले॰ पण आतांपर्यंत मौन असलेले कालीचरण म्हणाले–मग राम आणि रहीम यांचेहि ध्यान होत असेल, आणि मंदिर, मसजिद, चर्च यांच्या प्रदक्षिणा होत असतील, शिवाय वेद, कुराण बायबलचे पठण होत असेल ?

शिवप्रसाद–शक्यता आणि सवलतीनुसार सर्व कांहीं होते॰ पण कशाविषयींच अंधविश्वास बाळगला जात नाहीं.

कालीचरण–पण अशाने एकता आणि प्रेम कां कुठें वाढू शकेल ?

शिवप्रसाद–हे भविष्यकाळच ठरवील ! इतके मात्र खरें कीं या मुळें या देशांत एकता जरूर निर्माण झाली.

कालीचरणला कांहींच उत्तर सुचलें नाहीं, तो क्षणभर गप बसून गुणगुणूं लागला–एकसाधतां सर्व मिळें । सर्व साधता सर्व वळें ।

इतक्यांत ज्ञानचंद आतून येवून म्हणाले–चला मंडळी, पानें तयार आहेत. झालेल्या उशीराबद्दल क्षमा मागतो.

जफरुल्लाखां–ज्ञानबाबु कशाला मागता माफी ! आणखी थोडा उशीर होवूं द्या, म्हणजे आणखी आम्हांला कडाकून भूक लागेल नी आम्हीं फायद्यांत राहूं !

ज्ञानचन्द्र हंसत म्हणाले— हरकत नाहीं उद्यांपर्यंत असेच इथे बसून रहा. फायद्यांचा ढीग पडेल.

सर्व एकदम हँसून उठले. तेव्हां जगदल्ला म्हणाला—न बाबा ना ! तोंपर्यंत तर भूक अन्न खाण्याऐवजी आमची चरबीज खावूं लागायची.

ज्ञानचन्द्र हँसून म्हणाले— मग चला उठा, चरबी वांचवा आणि अन्न खा.

( २ )

जेव्हां सर्व मंडळी पानावर बसली तेव्हां ज्ञानचंद्रने वाढण सुरू केलें. लाडू, शिरा, भजीं, भाजी, पुरी, लिंबू चटणी वगैरे सर्व सामग्री वाढून झाल्यावर कालीचरणच्या पुढें एक स्वतन्त्र तार आणून ठेवलें आणि त्यांत फक्त तुपाचा गोळा तेवढा ठेवलेला होता.

कालीचरण आश्चर्यानें म्हणाला— हे काय ज्ञानबाबू.

ज्ञानचंद्रनें अति नम्रतेनें म्हटलें— कालीबाबू, हा तुपाचा गोळा आहे, सर्व रसांचा राजा आणि सर्व प्रकारच्या मिठाईचे सारसर्वस्व !

कालीचरण जरा तिरकटपणानें म्हणाला - पण भल्या माणसा हा नुसता तुपाचा गोळा मी कसा काय खाणार ! आणि खाल्ला तरी पचणार कसा !

ज्ञानचंद्रनी हंसे दाबीत पण अधिकच नम्रतेने म्हटलें कालीबाबू !

एक साधतां सर्व मिळे । सर्व साधतां सर्व पळे ।

ज्ञानचंद्रचे मुखांतून वरील कडवे बाहेर घड पडलेहि नाहीं तर हंसता

हंसता मंडळी लोटपोट झाली.

कालीचरणने थरमून म्हटलें-अरे बाबा, परत घेतले मी माझे कडवे, पण आतां मेहरबानी कर नी हें पात्र बदल !

## ३० बड्या बापांचे बेटे

' आमचे वाडवडील राजे होते.

' आमचे वाडवडील तर महाराजे होते '

' आणि आमचे तर सम्राट होते '

' आतां सांगा बरें आपण या तिघांपैकीं कुणाला श्रेष्ठ समजतां ?

' माझे मते सम्राटाची संतती सर्वांना मोठी, त्यानंतर महाराजांची, आणि त्यानंतर राजांची '

' पण आज कशी मोठी आहे. '

' आणखी कशी मोठी असो अगर नसो पण मूर्खता आणि पागलपण यांत तर निःसंशय मोठी आहे. '

' म्हणजे ? '

' म्हणजे असें कीं राजकुमारांनी राज्य गमावले, महाराज पुत्रांनीं महाराज्य गमावले. आणि सम्राट पुत्रांनीं सर्व साम्राज्य गमावले. तेव्हां ज्यानीं जास्त गमावले तो जास्त मूर्ख आणि पागल. कांहीं का असेना बड्या वाडवडीलांचे बेटे कोणत्याना कोणत्या कामांत तरी बडे आहेतच कीं नाहींत ? दिवळी करण्यांत असो नाहीं तर दिवाळे काढण्यांत असो !

# ३१ तीन पागल

प्रवासांकरतां लोक रेल्वेचा उपयोग करतात. पण माझे तर असें मत आहे कि, रेल्वेची मुशाफरी हाच एक उत्तम प्रवास आहे, रेल्वेचा एक डब्बा म्हणजे नाना प्रकारचे सामान आणि कैक निरनिराळे प्रान्त यांचा प्रतिनिधीच समजला पाहिजे. अजबखान्यासारखी दुनियेची छोटीशी आवृति म्हणजेच हा रेल्वेचा डबा, कधीं कधीं तर या डब्याच्या अजबखान्यांत अशीं दृश्यें नजरेस पडतात कि, मग तसल्या गोष्टी बाहेर पाहण्याची इच्छाच नाहींशी होते. माझेच पहाना, वेड्यांचे इस्पितळ पाहण्याकरतां नागपूरला उतरणार होतो परंतु पागलांचें नमुनें मला रस्त्यातच पाहायला मिळल्यावर वेड्यांचे इस्पितळांत जावून काय पाहणार ?

(२)

वर्धा स्टेशनावर मी पॅसेंजर पकडली. माझ्याच डब्यांत एक मौलवी साहेब बसले होते. परस्परांच्या नमस्कार चमत्कार झाल्यावर, साहजिकच धार्मिक, खास करून मांसाहाराच्या चर्चेला तोंड लागले.-'आपण हजचे यात्रेकरू दिसतां-म्हणजे यात्रा करून आलेले.' मी म्हणालो.

मौलवी - आपण कशावरून ओळखले ?

मी आपल्या बोलण्यावरूनच मला समजूं शकलें कि आपण जेंव्हां हजचा संकल्प केला—अहरामचे कपडे घातले-तेव्हां पासूनच आपला मांसाहार बंद झाला. आणि तुम्हीं घरीं पोंहचत नाहीं. तोपर्यंत तो तसाच बंद राहणार आहे.

मौलवी-आपण बरोबर ओळखलेंत माझा मांसाहार बंद आहे.

मी जरा चमकूनच म्हणालो - एकूण इस्लाम सुद्धां मांसाहाराच्या विरुद्धच दिसतो ! मग या देशाचेच मुसलमान मांसाहारावर इतका जोर कां देतात !

मौलवी-इस्लाममध्यें नेहमी करतां मांसाहार थोडाच बंद केला आहे ! फक्त हजचे वेळीं केला आहे.

मी - हा तर फक्त संकेत आहे. मुहम्मद साहेबांनीं रस्ता दाखवला, त्यावरून अग्रसर होणे आमचे काम आहे. त्याकाळीं अरबस्थानांत मांसाहार बंद होवू शकत नव्हता. पण हिंदुस्थानांत तशी गोष्ट नव्हती आणि आज तर मांसाहार सर्वस्वी बंद होणे शक्य आहे. मग मुसलमानांनीं तो कां करू नये !

मौलवी - म्हणजे मग मुसलमानांचे हिंदूतच रुपांतर होईल !

मी - एवढयावरूनच जर मुसलमानांना हिंदु म्हणतां येत असेल तर हजचेवेळीं मुसलमान हिंदु होत असले पाहिजेत ?

मौलवी साहेब जरा खिजुन म्हणाले - धर्माच्याबाबद असली अकलेची कसरत काय कामाची !

मी-म्हणजे धर्म हा बेअकली लोकां करतां आहे, हा याचा अर्थ !

मौलवी - आपण कांहीं म्हणा, पण कुराणानें जे करायला आम्हांला सांगितलें त्यापेक्षां इंचभर देखील पुढें सरकणें आम्ही ' कुफ्र, समजतो.

मी चुप राहिलों, विचार केला - मौलवीजी आहेत पागलखान्यांत पाठवण्यालायकच,पण 'कुफ्र पासूनच तर त्यांना वाचवलेच पाहिजे.

मौलवी साहेब सिंदीला उतरून गेलेत.

( ३ )

त्यांच्या रिकाम्या जागेवर हातपाय ताणून जरा आराम करण्याचें माझ्या मनांत येतें तो एका पंडितजींनी आपलें सामान तेथें ठेवलें मी आपले पाय आखडून घेतले आणि त्यांनीं लगेच आपलें तेथें आसन जमवलें.

एकदोन मिनटांत आपले सामान ठाकठीक करून त्यांनी सुट - केचा सुस्कारा सोडला. आणि मग मला विचारलें - आपली जात ?

मी म्हणालो—मनुष्य.

पंडितजी - ते तर मलाहि दिसते. पण उत्तर देण्यापूर्वी माझ्या प्रश्नांचा आशय तर समजून घ्यायचा होता.

मी - इतका कांहीं कठिण नाहीं आपल्या प्रश्नाचा आशय. तो तर तावडतोब समजला, पण आपणालाहि उत्तराचा अर्थ समजायला पाहिजे होता.

पंडितजी - काय अर्थ आहे आपल्या उत्तराचा ?

मी - आणि काय आशय आपल्या प्रश्नाचा ?

पंडितजी-माझ्या प्रश्नाचा आशय असा कि, ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य शूद्र यापैकीं आपण कोण ?

मी - आणि माझ्या उत्तराचा अर्थ असा कि मनुष्यजातीशिवाय मी दुसरी जातच मानीत नाहीं.

पंडितजी - कां नाहीं मानीत ?

मी - कारण हे जातिभेद ईश्वर-निर्मित नाहींत म्हणून !

पंडितजी - मग हे जातिभेद पडण्याचे कारण ?

मी - उद्योगधंद्यांच्या व्यवस्थेकरतां !

पंडितजी - म्हणजे यांच्या खाण्यापिण्याशी कांहींच संबंध नाही !

मी-बिलकुल नाहीं.

पंडितजी - याचा अर्थ, आपण प्रत्येक ठिकाणी जगन्नाथ पुरीचा भ्रष्टाकारच निर्माण करू इच्छिता !

मी-मग त्यांत वाईट काय आहे. जातपात न मानणे त्याकरितांच तर हा इशारा आहे !

पंडितजी - पण इशार्याच्या पुढें जाणे हा अधर्म आहे.

मला हंसू आलें पण मी दाबलें मनांत म्हणालो पागल नंबर दोन.

यानंतर नागपूर येईपर्यंत आमची भाषा बंद होती.

(४)

नागपूरला स्टेशनच्या बाहेर पडल्यावर एका गर्दीकडे माझें लक्ष गेलें. त्या गर्दीत एका अर्धनग्न माणसानें दुसऱ्या माणसाचे बोट धरलें होतें. आणि तो मनुष्य आपले बोट सोडविण्याची खटपट करतां करतां अगदीं कातावून शिव्या देत होता.

तपासांती कळले कि त्या अर्धनग्न माणसानें त्या दुसऱ्या माणसाला इतवारीचा रस्ता विचारल्यावरून त्यांनी बोटाच्या इशाऱ्यानें रस्ता दाखवला होता. तेव्हां पहिल्यानें त्याचे बोटच पकडले आणि म्हणूं लागला कि, आतां सांपडला रस्ता. हे बोट तर रस्ता आहे.

मी आश्चर्यानें मनांतल्या मनांतच म्हणालो -हा तर ते मौलवीजी आणि पंडितजी यांचाच भाऊबंद दिसतो आहे.

इतक्यांत पोलिसचे दोन शिपाई येऊन त्यांनीं त्याला पकडले

आणि दोनचार थोबाडींत भडकावूनहि दिल्यात.

त्यांच्याकडून कळलें, कि तो पागलखान्यांतील पागल असून पहारेकऱ्यांचा डोळा चुकवून पळून आलेला होता. तेव्हां मी समजलो कि बोटांतच किंवा बोटा पर्यंतच रस्ता समजण्याचा मूर्खपणा तो करीत होता तें।

पोलिस त्याला पागलखान्याकडे घेवून गेलेत, नी मी प्लॅटफार्म कडे परतलो. मनांत विचार केला कि आतांपर्यंतच तर तीन पागल पाहून चुकलो, दुनियेंत पागलच पागल दिसतात, तेव्हा निराळा कोणता पागलखाना पहावा?

---

# दोन कुंभार

कुंभारांचें दोन कुटुंब होते. शेजारांत राहात होते दोघांच्या घरांच्या मधोमध एक मैदान होतें.

दोन्ही कुटुंब रात्रंदिवस परिश्रम करित असत, मुलें म्हातारे पुरुष स्त्रिया सर्वांना एका क्षणाचीहि फुरसत नव्हती. कोणी माती आणीत तर कोणी पाणी भरीत कोणी माती चाळीत तर कोणी चाक फिरवून मातीचीं भांडीं घडवीत आणि नंतर भट्टी लावून उत्तम प्रकारें भाजून तयार करीत. त्यांचा प्रयत्न हा होता कीं, भांडीं इतकीं उत्तम भाजल्या जावीत कीं तीं लोखंडाचीं नाहीं तर दगडाशीं तरी पैज अवश्य मारतील. दोन्ही कुंभारांचें कुटुंब रात्रंदिवस ह्याच कामांत गढून गेलेले राहात. त्यांची ती मेहनत पाहून कोणी ही धन्य धन्य म्हणू लागत.

आणि संध्याकाळच्या वेळीं ते दोन्ही कुंभार कुटुंब तेथील मैदानांत येत आणि उत्तम प्रकारें भाजलेलीं मातीचीं भांडीं एकत्रित करित आणि त्या भांड्यांचें द्वंद युद्ध केलें जाई. दोन्ही कुंभार आप-आपलीं मडकीं एक दुसऱ्याच्या मडक्याशीं लढवित. बहुतेक मडकीं अगदींच फुटून जात असे. तें त्यांचे तुकडे मैदानाची शोभा वाढविण्याकरितां तेथेंच टाकून दिले जात असे. कांहींचें तुकडे झाले नसून थोडया फार रेघा गेलया आहेत अशी मडकीं मोठया प्रयत्नानें घरीं आणून त्याचा पुन्हा प्रयत्न केला जात असे की तीं दुरूस्त करुन दुसरे दिवशीं पुन्हा भिडविण्याचा कामांत येऊं शकतील. आणि जें अगदीं मजबूत राहत असे त्यांना पुष्पहार घालून त्यांची मिरवणूक काढण्यांत येई. घरीं आणून त्यांना सन्मानानें उंचस्थानीं विराजमान करण्यांत येई.

हीच होती त्या दोन्ही कुंभार कुटुंबाची दिनचर्या अथवा जीवनचर्या. त्यामुळें त्यांनीं मोठें नांव मिळविले होते

(२)

सुटींत मी जेव्हां घरीं आलो,तेव्हां मी देखील त्या कुंभार कुटुंबाची प्रसिध्दी ऐकली. परंतु त्यांच्या पागलपणाचें मला फार हंसूं आलें हंसण्यापेक्षांहि जास्त आली दया. मी विचार केला—गाढवा बरोबर राहून राहून ते बिचारे स्वत:हि गाढव बनलेत आणि आपलें जीवन बर्बाद करित आहेत त्या बरोबरच मनुष्य जातीचेंहि नुकसान करीत आहेत. जीं मडकीं मनुष्यांना थंडे पाणी पाजतीं खाण्यापिण्याच्या वस्तु ठेवण्याच्या कामांत येतीं तीं मैदानांत तुकडे आंथरीत आहेत स्वत:हि बर्बाद होतात आणि मैदानहि खराब करतात.

(३)

संध्याकाळीं जेव्हां मी फिरावयास निघालों तेव्हां त्या कुंभारांवर रुबाब टाकण्याकरितां मी आपला सरकारी पोशाख करूनच बाहेर निघालों जेव्हां मी मैदानांत आलों तेव्हां मडक्यांचें द्वंद्वयुद्ध जोरांत चाललें होतें. दोन्ही कुटुंबांतील म्हातारे, मुलें, युवक, पुरुष, स्त्रिया सर्वच सारी शक्ति लावून मोठ्या तन्मयतेनें त्याच कामांत लागले होते त्यावेळीं कोणालाच गोष्ट करण्याची देखील फुरसत नव्हती.

जेव्हां द्वंद्वयुद्ध समाप्त झालें मडक्यांच्या तुकड्यांनीं मैदान भरून गेलें आणि बाकी राहिलेलीं दोन तीन मडकीं घेऊन कुंभार घरीं जाऊं लागलेत तेव्हां मी कुंभारांपैकीं एका कुटुंबांतील पुढाऱ्याला म्हणालों, हा काय गाढवपणा करतां ? रात्रंदिवस चांगलीं मडकीं तयार करतां आणि अशा प्रकारें फोडून टाकतां ! जागा खराब करतां आपले श्रमहि नासून टाकतां आणि कंगाल बनतां ! जरा विचार तर करा, ही सारी शक्ति अगर तुम्ही आपल्या आणि जगाच्या हिताकडे खर्च कराल तर किती उत्तम.

पुढाऱ्यानें मला पायापासून तें डोक्यापर्यंत न्याहाळून पाहिलें आणि नंतर एखाद्या ज्ञानी व्यक्तिप्रमाणें हास्य केलें.

मी म्हटलें—हंसण्याचा हेतु ? काय मी ठीक नाहीं बोललों ?

तो म्हणाला-ठीक तर बोललांत परंतु एका छिनालीच्या तोंडून सतीत्वाच्या गोष्टी चांगल्या नाहीं वाटत. मी मनांतल्यामनांत क्षुब्ध झालों, त्याच्या बोलण्याचा सार माझ्या लक्ष्यांत आला नाहीं तरी पण आपल्याला छिनालीचा उपमा दिली एवढें तर समजलोंच आणि माझ्या सारख्या एका सरकारी मनुष्याचा हा केवढा भयंकर अपमान होता, या कल्पनेनेंच मी थरथरूं लागलो. रेलगाडींत मोठमोठ्यांचा अपमान करणारा मी अशा तऱ्हेनें

अपमानित होईल ही कल्पना देखील असह्य होती परंतु त्यावेळीं शांति-पूर्वक गोष्ट केल्याशिवाय दुसरा उपाय नव्हता करितां मी जरा शांत राहूनच म्हटलें कीं तुम्ही मला हें काय म्हणतां ! तो म्हणाला-आपण फौजी शिपाई आहांत ना ?

मी म्हटलें होय.

तो—मग तर ठीकच म्हणत आहों. मी थोड्याशा मैदानांत आपल्या हातानें तयार केलेल्या मडक्यांचीं खापरें आंथरतों परंतु तुम्ही परमात्म्यानें तयार केलेल्या मनुष्यांचा देह फोडून खोपड्या आंथरतां, लाखों मैल जमीन बर्बाद करतां, करोडो मनुष्यांचे परिश्रम ह्या बर्बादीच्या कामांत बर्बाद करतां. थोडा विचार तर करा कीं, ही सारी शक्ति अगर तुम्ही आपल्या आणि जगाच्या कल्याणांत खर्च कराल तर किती उत्तम होईल ? जग येथेंच स्वर्ग बनेल. परंतु तुम्ही एवढा विचार करतां कोठें ? आतां सांगा कीं, माझा गाढवपणा आहे कीं तुमचा ?

अनिच्छापूर्वकच माझ्या तोंडातून निघालें ' माझा.'

माझा चेहरा फिका पडला होता तो पाहून त्या कुंभाराला दया आली.

तो म्हणाला—आतां वाईट वाटून घेऊं नका. यांत आपला कांहीं अपराध नाहीं. हा गाढवपणा सर्व दुनियेवर सवार झालें आहे. कोणी देश शिल्लक राहिला नाहीं आणि आमचे व तुमच्यांचे पूर्वज-हि ही गोष्टी करीत आले आहेत. गोष्ट अशी आहे कीं, मनुष्यांचा आकार जरी मनुष्या सारखा आहे परंतु अजून त्यांत मनुष्यता आली नाहीं जेव्हां साऱ्या जगांतील मनुष्यांमध्यें माणुसकी येईल तेव्हां तुमचा गाढवपणाहि जाईल आणि माझाहि गाढवपणा जाईल.

# (३३) पाहिजे

# एक परमात्मा

जो दुनियेची अंधेरशाही दूर करूं शकेल. पाप पुण्याचे फळ मिळायला जो उशीर लागतो तो कमी करूं शकेल. आणि पुण्यपाप व त्याचे फलाफल यांच्या कार्यकारण भावाची प्रत्येकाला माहिती करून देवू शकेल. पाप्याना सुरवातीलाच पापकरण्यापासून परावृत्त करूं शकेल.

सुव्यवस्थेकरतां त्याला खालील कार्ये त्वरित करावें लागतील :—

[१] व्यभिचार किंवा बलात्कार करतेवेळीं लोक नपुंसक व्हावेत।

[२] खोटें बोलतांना किंवा कटुवचन उच्चारतांना लोकांचे जिभेवर–यथायोग्य फोडें उठावेत ।

[३] कोणाला अन्यायानें सतवतेवेळीं किंवा कुणाचे प्राण घेतेवळीं लोक हातापायांनी लुले लंगडे व्हावेत !

[४] चोरी करतेवेळीं बोटें झडन जावित !

[५] गरजेपेक्षां अधिक धनसंचय करणाराचे धन राख होवो !

[६] गरजेपेक्षां जास्त खाणारांचे पोटांत खातेवेळींच पोटशूळ उठो !

[७] कर्तव्य सोडुन पळणारांचे अंगावर लखवा जावो !

[८] दुसऱ्यांचे जमीनीवर किंवा देशावर अधिकार करणारावर विद्युत्पात होवो !

[९] रंग, राष्ट्र प्रांत इत्यादी मानवतेचे तुकडे करणाऱ्यांची स्मृति नष्ट होवो !

[१०] भूमि जितकी जनसंख्या पोसू शकते त्याहून अधिक वाढण्याची वेळ येतांच पुनः गरज पडे पर्यंत संतति होणें बंद होवो।

याशिवाय सुव्यवस्था आणि सुखशांतिकरितां जी जी जरुरी कामें करावी लागतील ती ती केली पाहिजेत!

पगार-सांजसकाळ त्याचे भक्तिपूर्वक नामस्मरण केलें जाईल, सर्व ठिकाणी त्याचा सर्वाहून जास्त सन्मान करण्यांत येईल. मनुष्य जातिने आजपर्यंत लावलेले सर्व शास्त्रीय शोध त्याचे चरणावर वाहिले जातिल.

सूचना :— पगार आगावूं मिळणार नाहीं, कमीतकमी एक वर्ष पर्यंत संतोषजनक काम केल्यावर मिळेल.

लिहा अगर भेटा :—

मनुष्यता कार्यालय,

मोहल्ला:— सत्याश्रम,

पोष्ट — सत्यनगर,

तहसील—पृथ्वी,

जिल्हा —सौरजगत.

# सत्य समाज

सत्यसमाज, मनुष्यमात्राचें असें संगठन आहे कीं, जें साऱ्या जगाचें एक कुटुंब बनवूं इच्छितें. ज्यांत सर्व धर्मांचें, राम, कृष्ण, महावीर, बुद्ध, ईसा, महम्मद, कार्लमार्क्स इत्यादि महात्म्याचे गुणगान केल्या जातें, परंतु कोणत्याच धर्माची, महात्म्याची, धर्मपुस्तकाची अंधभक्ति करीत नाहीं. अनेक तऱ्हेचें संशय आणि अन्धविश्वास नाहींसे केले जातात, मनुष्य निःपक्ष विचारक बनविला जातो. त्याची विचारधारा वैज्ञानिक रंगांत रंगविली जाते. त्याला आणि त्यांच्या कुटुंबी लोकांना कुरूढिच्या बंधनापासून मुक्त केल्या जाते.

जातिपातींचीं बंधनें तुटून जातात. नरनारींच्या अधिकाराची विषमता दूर होते.

साम्राज्यवाद आणि पूंजीवादाचें विषापहरण करण्याकरितां मनुष्याला तयार केले जातें. सत्यसमाजी मनुष्यमात्रांचीं प्रत्येक तऱ्हेचीं दुःखें, त्रास आणि अनेक गैरसोयी दूर करण्याकरितां अनेक तऱ्हेच्या क्रान्ती करितां तयार असतो. सत्यसमाजाचा उद्देश लोकांना मरणानंतर स्वर्ग देण्याचा नसून हा च दुनियेला स्वर्ग बनविण्याचा आहे.

आपण सर्वधर्माचें बंधन तोडून देखील सत्यसमाजी बनूं शकतां, खऱ्या आणि उदारपणानें आपल्या धर्मांत राहून देखील सत्यसमाजी बनूं शकतां परंतु जातिपातीचें बंधन तोडावीच लागतील.

अथवा सत्यसमाजाचें सिद्धांत मानून त्यांच्या कार्यांत यथाशक्ति तन मन धनानें मदत देऊन सत्यसमाजाचें अनुमोदक बनूं शकतां. परंतु आपलेंपणा जरूर पाहिजे.

आपण स्त्री आहांत कीं पुरुष, ब्राम्हण आहांत कीं शूद्र हिंदू आहांत कीं मुसलमान ईसाई आदि, काळे आहांत कीं गोरे, कुलीन आहांत कीं अकुलीन किंवा व्यभिचारजात, श्रीमंत आहांत कीं भिकारी, अगर आपण ईमानदार आहांत, सत्यसमाजाचे चोवीस जीवन सूत्र मानतां, शक्य तों त्याला अनुसरून वागण्याचा प्रयत्न करीत आहांत, कौटुंबिक आणि आत्मीय भाव आपणांत आहेत तर सत्यसमाजांत आपलें सानंद स्वागत आहे.

---

RSITY LIBRA
8 MAY 194
ALLAHAB

## सत्याश्रम वर्धा

वर्धेचें सत्याश्रम, जें वायगांव रोडवर वर्धा स्टेशनपासून एक मैलावर आहे. तें हिंदू, मुसलमान, ईसाई, जैन, बौद्ध, पारशी आस्तिक नास्तिक इत्यादि सर्वांकरितां तीर्थस्थान आहे. सर्व जाति आणि धर्मांच्या मनुष्य मात्रांना तेथील दार उघडें आहे. जो ईमानदार सदाचारी, जिज्ञासु, कर्मठ आणि विनयी आहे त्याच्या करितां राहाण्याची आणि शिक्षदीक्षाची शक्य तों व्यवस्था आहे. अनाथ परंतु होतकरू मुलांना जागा आहे. योग्य विद्यार्थी विद्यार्थिनींच्या सत्य शिक्षणाची व्यवस्था आहे. सेवाभावी रिटायर्ड लोकांना येथे निवास करण्याचें ठिकाण आहे. धर्मालयाचें दर्शन आणि समभावी प्रवचनांचा लाभ तर प्रत्येकानें घेतला पाहिजे.

---